गुरूवार, २९ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 29 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-189 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

## आरक्षणासाठी मराठा समाजाने निवडणुका लढवाव्या: आंबेडकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठा आरक्षणाचा प्रश्न शांततेत सोडविण्याऐवजी मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण केले जात आहेत. मराठा आणि ओबीसींचे आरक्षण वेगवेगळे असावे, अशी वंचित बहुजन आघाडीची स्पष्ट भूमिका आहे. आरक्षणासंदर्भातील काही आंदोलने पाहिली असून ती कशी दडपली जातात, हे माहिती आहे. मराठा समाजाचे आंदोलन दडपले जाऊ नये, यासाठी त्यांनी निवडणूक लढविली पाहिजे, असा सल्ला वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला. मुस्लिम आणि ओबीसी समाजाने ऐक्य ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने 'सत्ता परिवर्तन महासभेचे' आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी आंबेडकर बोलत होते. शहर अध्यक्ष मुन्नवर कुरेशी, प्रकाश शेंडगे यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेच्या एक मतदाराने पाच मतदार जोडावेत, असे राजकीय गणितही आंबेडकर यांनी यावेळी मांडताना भारतीय जनता पक्षावर कडाडून टीका केली. ते म्हणाले की, आगामी निवडणूक ही पक्षाची नाही. कोणत्या पक्षाला सत्तेवर बसवायचे याचीही नाही. मात्र अधिकार शाबूत ठेवण्यासाठीची ही निवडणूक आहे, ही बाब लक्षात घ्यावी लागेल. उद्याची व्यवस्था काय असेल, याची चुणूक राज्य सरकारने दाखविली आहे. शासकीय कर्मचारी भरती प्रक्रिया न करता कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबविली जात आहे. वेठबिगार आणण्याची सरकारची भूमिका आहे. सरकारकडून हमी, शाश्वती संपवली जात आहे. नागरिकांचे स्वातंत्र्य बंदिस्त करण्याचा भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा डाव आहे. त्यासाठी दंगलीही घडविल्या जातील, आरक्षणही कागदावरच ठेवले जाईल. यापूर्वीच्या सत्तेवरील राजकीय पक्षांनी घटनेने दिलेल्या चौकटीबाहेर जाणार नाही, असे बंधन घालून घेतले होते. त्यामुळे नागरिकांचे अधिकार, त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले होते. मात्र भाजपला आता बंदिस्त व्यवस्था निर्माण करायची आहे. त्यामुळे त्याविरोधात उभे रहावे लागणार आहे. उपेक्षितांच्या चळवळी उभ्या करताना मुस्लिम समाजाला बरोबर घ्यावे लागले. मुस्लिम समाज राजकीय पक्षांमध्ये त्यांची सुरक्षितता शोधत आहे. मात्र त्यांना राजकीय पक्ष सुरक्षा देणार नाहीत.

## सव्वा लाख लोकांची तहान टँकरच्या पाण्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** थंडीचा हंगाम संपत आला असतानाच पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या असून जिल्ह्यातील जत व आटपाडी तालुक्यातील ६१ गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने बुधवारी देण्यात आली. या गावातील १ लाख २९ हजार ५५६ लोकांना आपली तहान टँकरच्या पाण्यावर भागवावी लागत आहे. जत तालुक्यात टंचाईग्रस्त गावांची संख्या ५८ तर आटपाडी तालुक्यात ४ आहे. सध्या जतमध्ये ५४ तर आटपाडी तालुक्यात ३ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या दोन तालुक्यातील ६१ गावे आणि ४११ वाडी वस्तींना सध्या टँकरने पाणी पुरविण्यात येत आहे.

# शिवपुत्र संभाजी महानाट्याची तयारी अंतिम टप्प्यात

### १ मार्च रोजी शुभारंभ : आ. नीलेश लंके यांच्याकडून तयारीचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**नगर :** आ. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने नगरच्या नेमाणे इस्टेट येथे आयोजित करण्यात आलेल्या शिवपुत्र संभाजी या महानाट्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असून आ. नीलेश लंके यांनी या तयारीचा बुधवारी आढावा घेतला. दि. १ ते ४ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या महानाटयासाठी दररोज साठ हजार प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली असून नगर दक्षिण मतदारसंघातील विविध तालुक्यांसाठी व नगर शहरासाठी वेगवेगळया दिवशी आयोजन करण्यात आले आहे. दक्षिण नगर जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये महानाटयाच्या प्रवेशिका पोहचविण्यात आल्या असून आ. लंके यांची यंत्रणा रात्रंदिवस नियोजनासाठी झटत आहे. खा. डॉ. अमोल कोल्हे हे या महानाटयामध्ये छत्रपती संभाजी महाराजांची भुमिका करणार असून १ ते ४ मार्च दरम्यान दररोज सायंकाळी सहा वाजता महानाटयाच्या प्रयोगास सुरूवात होणार आहे. दोन तास ४० मिनिटांचे हे ऐतिहासिक महानाटय आहे. डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह ज्येष्ठ कलाकार राजन बाने हे औरंगजेबाची भुमिका साकारणार आहेत तर स्नेहलता वसईकर, महेश कोकाटे, विश्वजीत फडते, अजय तापकीरे, रमेश कोरडे हे सिनेकलाकारही महानाटयामध्ये वेगवेगळया भुमिका साकारणार आहेत. दिडशेहून अधिक स्थानिक कलाकारांनाही या महानाटयामध्ये संधी देण्यात आली आहे. जगदंब क्रिएशन व महाराजा शंभू छत्रपती प्रोडक्शनच्या स्वराज्याच्या छाव्याचा धगधगता इतिहास मांडणाऱ्या या ऐतिहासिक महानाटयाचे लेखक आणि दिग्दर्शक महेंद्र वसंतराव महाडीक हे आहेत.



**शहर व तालुकानिहाय नियोजन** : दि. १ मार्च नगर शहरातील प्रभाग १४,१५,१६,१७ पारनेर तालुक्यातील जि. प. चा सुपा व ढवळपुरी गट व श्रीगोंदे तालुक्यातील सर्व गावे. दि. २ मार्च नगर शहरातील प्रभाग १०,११,१२,१३ भिंगार, पारनेर तालुक्यातील कान्हूरपठार गट, टाकळीढोकेश्वर गट, पारनेर शहर, कर्जत व जामखेड तालुक्यातील सर्व गावे. दि. ३ मार्च दि. ३ मार्च नगर शहरातील प्रभाग क्र. ६,७,८,९ नगर मतदारसंघातील ४३ गावे, शेवगांव व पाथर्डी तालुक्यातील सर्व गावे. दि. ४ मार्च नगर शहरातील प्रभाग क्र. १,२,३,४,५ नगर तालुक्यातील ४३ गावांव्यतिरिक्त उर्वरीत गावे, राहुरी तालुक्यातील गावे.

**१२० फुट किल्ल्याचा रंगमंच** : या महानाटयासाठी १२० फुट किल्ल्याचा रंगमंच तयार करण्यात आला असून खरी खुरी लढाई, हत्ती, घोडे, बैलगाडया, २६ फुटी जहाजावरून जंजिरा मोहिम, चित्तथरारक घोडेस्वारी, संपूर्ण मैदानाचा रंगमंच म्हणून वापर करण्यात येणार आहे.



**आ. लंके यांची यंत्रणा ॲक्टीव्ह मोडवर** : महानाटयाची घोषणा झाल्यापासून आ. नीलेश लंके यांची जिल्हयातील यंत्रणा ॲक्टीव्ह मोडवर आली असून जिल्हयातील तब्बल ५ हजार कार्यकर्त्यांनी फळी वेगवेगळया नियोजनाची जबाबदारी पार पाडत आहे. नगर दक्षिण जिल्हयाच्या प्रत्येक गावामध्ये जात लंके यांच्या कार्यकर्त्यांनी प्रवेशिका घरोघर पोहच केल्या असून दररोज आ. लंके हे कामाचा आढावा घेत आहेत.


**एकदा तरी महानाटय पहा** : स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींचा इतिहास भावी पिढीला समजावा आणि त्यातून प्रेरणा घेण्यासाठी एकदा तरी हे महानाटय पहावे. **खा. डॉ. अमोल कोल्हे**

**डॉ. कोल्हे यांची चित्तथरारक घोडेस्वारी** : या महानाटयामध्ये डॉ. अमोल कोल्हे यांची मैदानातून चित्तथरारक घोडेस्वारी पहावयास मिळणार आहे. महानाटयासाठी १५० फुट लांब ८० फुट रूंद व ५ मजली किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृतीचा ६७ लाख रूपये खर्चाचा सेट उभारण्यात आला आहे.



महानाटयासाठी २० लाख रूपयांची राजेशाही ड्रेपरी, 4 लाखांचे शस्त्रास्त्रे आणि युध्द साहित्य वापरण्यात येणार आहे.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

एस एम जोशींनी हे विधान करून बरीच वर्षे झाली पण अजूनही समाजातले काही घटक असे आहेत की ज्यांना सावरकर पचनी पडलेले नाहीत. एस एम जोशींच्या विधानाला उत्तर देताना प्रख्यात गायक सुधीर फडके उर्फ बाबूजी असं म्हणाले होते की एस एम ना १९२१ पूर्वीचे सावरकर कळण्यासाठी ३५ वर्षे लागली. तेव्हा पुढचे सावरकर कळायला त्यांना आणखी ३५ वर्षे लागतील. बाबूजींचे हे विधान आजही आम्हाला लागू पडते. आम्हाला गांधीजी कळायलाही वेळ लागतो आणि सावरकरांना समजून घ्यायला सुद्धा. जसे सावरकरांबद्दल मतभेद आहेत तसेच गांधीजींबद्दल सुद्धा आहेत. पण या ठिकाणी फक्त एवढंच विधान करून थांबतो की दोघेही आपापल्या जागी श्रेष्ठ आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही जशी सावरकरांच्या वाटेला उपेक्षा आली, तशीच आणखीही काही स्वातंत्र्यसैनिकांच्या वाट्याला आली. डॉ पांडुरंग खानखोजे हे असंच एक नाव. स्वातंत्र्यासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा लोकमान्य टिळकांपासून घेऊन ते अगदी कमी वयात अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी गदर पार्टीच्या स्थापनेत सहभाग घेतला. याच ठिकाणी कृषी विद्यापीठातून संशोधन करून डॉक्टरेट मिळवली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात येतातच त्यांना तत्कालीन भारत सरकारने अटक केली. नंतर त्यांना परत पाठवण्यात आले. ते मेक्सिको देशात गेले. तेथे त्यांनी कृषिक्षेत्रात अक्षरशः क्रांती करून त्या देशाच्या अन्नधान्य समृद्धीस हातभार लावला. आज मेक्सिकोच्या शिक्षण खात्याच्या कार्यालयात तेथील राष्ट्राध्यक्ष आणि इतर मान्यवर व्यक्तींची जी म्युरल्स म्हणजे मोठी भित्तिचित्रे लावली आहेत, त्यात डॉ पांडुरंग खानखोजे यांचेही म्युरल असून त्याच्या शिरोभागी ' आता गोरगरिबांनाही भाकर मिळेल ' असे लिहिले आहे. आपल्या देशाच्या सुपुत्राचा हा केवढा मोठा गौरव त्या देशाने केला आहे.

सावरकर म्हणजे अजोड प्रतिभा असलेला लेखक, कवी. असामान्य वक्तृत्व, दुर्दम्य जिद्द आणि आत्मविश्वासाचे प्रतीक असलेले व्यक्तिमत्व. कुशाग्र बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता यांचा अपूर्व संगम. त्यांनी ठरवले असते, तर त्यांना खोऱ्याने पैसा कमावता आला असता. सावरकरांसारखे गुण असणारे अनेक जण असूही शकतील. पण हे सगळे गुण भारतमातेच्या चरणी अर्पण करणारा सावरकरांसारखा भारतमातेचा पुत्र विरळा. धन्य ती भारतभूमी जिने अशा नररत्नांना जन्म दिला. सावरकरांना या कवितेच्या ओळी पुरेपूर लागू पडतात.






## आनंदी पहाट

# विद्यार्थ्यांची परीक्षेच्या काळात मानसिक स्थिरता महत्वाची

आधुनिक केसरी

विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या काया, वाचा आणि मन ह्या तीनही अंगे अभ्यासाच्या दृष्टीकोनातून, केलेल्या अभ्यासाच्या, परीक्षेतील यशासाठी महत्वाची असतात. त्या अनुषंगानं त्या तिन्हींची पुरेशी काळजी घेणं, त्यांना जपणं आवश्यक असतं. काया म्हणजे शरीर जे तंदुरुस्त ठेवणं, वाचा अर्थात आपलं बोलणं, व्यक्त होणं शुद्ध तसंच निर्मळ असलं पाहिजे आणि मन अंतर्बाह्य (अंतर्मन आणि बहिर्मन) स्वास्थ्यपूर्ण असणं जरुरीचं असतं. विद्यार्थ्यांनी विचार आणि वर्तन सकारात्मक करणं महत्वाचं आणि म्हणूनच आवश्यक असतं. परीक्षेच्यावेळी येणाऱ्या ताण- तणावांवर नियंत्रण मिळवणं अत्यंत जरुरीचं असतं. त्यासाठी, सहज पाळता येतील अशी काही तथ्य असणारी पथ्य विद्यार्थ्यांनी समजून घेणं उपयुक्त ठरू शकतं. नकारात्मक विचार, विषय, घटना, घडामोडी या सर्वांपासून स्वतःला दूर ठेवावं. मुलांना अभ्यासाची सवय लावण्यासाठी पालकांना बरेच परिश्रम घ्यावे लागत असतात. धाक दाखवून, चोप देऊन मुलांना अभ्यासाला बसविणाऱ्या पालकांनी सर्वप्रथम हे लक्षात ठेवावं कि, मुलांना अभ्यासाची गोडी लावण्याचं उद्दिष्ट त्या मार्गानं कधीही साध्य करता येत नसतं. त्यासाठी मुलांच्या अगदी बालपणापासूनच आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. केवळ अभ्यासाविषयी चर्चा करणं, त्यांच्या मनावर अभ्यासाचं दडपण निर्माण करणं, शिक्षेची दहशत निर्माण करणं, नकारार्थी, निराशावादी बोलणं, पदोपदी अपमानित करणं ह्या गोष्टी पालकांनी आवर्जून टाळणे योग्य ठरतं. प्राप्त परिस्थितीचा आनंदानं स्वीकार करून अंतर्मनाला अधिकाधिक प्रसन्न, आनंदी ठेवावं. परीक्षेच्या अनुषंगानं वेळेचं नियोजन करून प्रत्येक क्षण उपयोगात आणावा. कोणत्याही प्रकारे वेळ वाया जाणार नाही याचं भान राखावं, सतत साध्यासुध्या गोष्टीवरून चिडचिड करून नये.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## विमानी बैसले | तुका ब्रह्म ||

सांगितले ज्याने | जगण्याचे मोल ||
शब्दब्रह्म बोल | तुकोबाचे ||१||
बुध्दीला लागता | ज्ञानाचे डोहाळे ||
पुरवी उमाळे | अभंगात ||२||
काया वाचा मने | भजे हरिनाम ||
तेथे तुकाराम | सर्वकाळ ||३||
अभंगात न्हाली | माय इंद्रायणी ||
अमृताची वाणी | चिंब झाली ||४||
मौनात विरले | वैकुंठी निघाले ||
विमानी बैसले | तुका ब्रह्म ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



हितगुज




गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## अविश्रांत सेवाकार्य

शिष्यांकडून सेवा करवून त्यांना आत्मोद्धारासाठी कृपा करणे,वाट दाखवणे व त्यांच्याकडून दिव्याने दिवा लावून इतरांनाही अध्यात्माकडे उन्मुख करून मायेचा प्रभाव कमी करणे असे कार्य सातत्य श्री स्वामी सेवा मार्गात अखंडपणे सुरू आहे. दिंडोरी दरबारचे हे अविरत अविश्रांत चालणारे व्रतानुस्थान आहे.दिंडोरी मार्गात इतर धर्मियांना त्यांच्या धर्मग्रंथांच्या सूक्ष्मज्ञान बोधाद्वारे श्री स्वामी सेवेत रममान केले जाते. धर्म ज्ञानाविषयी अज्ञान व भ्रांतीमुळे संकीर्णता व मत भिन्नता निर्माण होऊन संघर्ष, दंगे होतात म्हणून खऱ्या धर्म ज्ञानाचा प्रसार होणे गरजेचे आहे. सर्व धर्मग्रंथ एकच शिकवण देत असतात.निर्भयता व मानवता, मूल्यात्मकता व आत्मोतदार सर्व धर्मांचे सार आहे. श्री श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नृसिंह सरस्वती, श्री स्वामी समर्थ महाराजांनी भारतभर भ्रमण करून हिंदू धर्माचे शाश्वत वैभव टिकवून वाढवून परकीय आक्रमणाच्या काळात स्वत्व,स्वाभिमान,अध्यात्म,ज्ञान यांचा प्रसार केला म्हणूनच हा भारत घोर राजकाळातही आपली संस्कृती,धर्म शाबूत ठेवून पुन्हा ताट मानेने उभा राहिला. राजा शिवछत्रपती, राणा प्रताप अचानक निर्माण होत नाहीत ते ईश्वरीय अवतार कर्तुत्वाचे कृपा फळ असते. आज आर्थिक अराजकता, बाजारपेठांची आक्रमक वृत्ती, उपभोग व चंगळ प्रवृत्ती यामुळे भविष्य पुन्हा सशंकित होत आहे. त्यावर मात करण्यासाठी, गुलामी टाळण्यासाठी कर्मनिष्ठ, राष्ट्रभक्त निस्वार्थ सेवेकरी होणे गरजेचे आहे. ही किमया फक्त दत्तोपासनेतून,श्री स्वामी समर्थ सेवेतून घडून येईल कारण हा सेवा मार्ग निष्काम कर्म मार्ग आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

देव वास नहिं चक्र पर,
मोह कल्पना जान ।
साचा सृष्टि विराट हैं, तीन लोक मय
ज्ञान ।।३०।।(स्वर्वेद तृतीय मण्डल
द्वितीय अध्याय) ०३/०२/३०


मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
चक्रांवर देवतांचा वास (निवास) मानणे ही अज्ञानयुक्त कल्पना आहे. तीन लोक सृष्टीचा एक विराट साचा आहे, ज्या द्वारे समस्त जग बनते. ब्रह्म, जीव आणि प्रकृती मिश्रीत या विशाल सृष्टीच्या मूलारंभ तेजोमय अंडाकारास विराट म्हणतात. एकदेशीय देव शरीरातील सर्व चक्रांवर निवास करतात, ही कल्पना अत्यंत मिथ्या आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# समाधान हा वृत्तीचा गुण आहे, देहाचा नव्हे

आधुनिक केसरी

सर्व ठिकाणी राम भरलेला जो पाहील त्यालाच समाधान मिळेल. ज्या घरात समाधान, तेथे भगवंताचे राहणे जाण. जे घडते ते भगवंताच्या इच्छेने घडते, अशा खऱ्या भावनेने एक वर्षभर जो राहील, त्याला समाधान हे काय ते खात्रीने कळेल. समाधान हा वृत्तीचा गुण आहे, देहाचा नव्हे. प्रपंचाबद्दल काहीही न सांगणारा, आणि अत्यंत समाधान असणारा मनुष्य भेटावा असे वाटते. त्याच्या मागे सारे जग लागेल. जगामध्ये आपल्याला समाधान कुणी देत नाही. समाधानाला निष्ठेची अत्यंत जरुरी आहे. पांडवांना वनवासात जे समाधान होते, ते राज्यपदावर असणाऱ्या कौरवांना नव्हते. म्हणून परमात्मा ठेवील त्यामध्ये सुखी राहावे. ' ठेविले अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥ ' हेच संतश्रेष्ठ तुकारामबुवांचेही सांगणे आहे. भगवंताची देणगी सर्व बाजूंनी गोड असली पाहिजे. पैसा ही भगवंताची देणगी नव्हे; त्याने तळमळ आणि अतृप्ती होते. खरोखर, समाधान हीच भगवंताची देणगी होय. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही. आहे त्या परिस्थितीत



आपण समाधान मानले की, जे आहे ते पुरेल. ज्याचे मन समाधानात आहे, त्याचे शरीर कसेही असले तरी चालेल. समाधानालाच खरे महत्त्व आहे. घेण्यापेक्षा देण्यामध्येच फार समाधान आहे. शिवाय, घेण्याला काही अंतच नाही. कितीही मिळाले तरी आपली मागण्याची बुद्धी कायम राहते. पण आपले सर्व काही दिले की देण्याला अंत आला, म्हणून त्यामध्ये समाधान आहे. आपण उपाधीने झाकले गेलो आहोत. एक एक उपाधी टाकीत गेले तर आपले खरे स्वरूप प्रकट होईल. तिथे खरे समाधान होते. ' राम कर्ता आहे ' ही भावना होणे हे वासनेचे मरण होय. मनुष्य काही तरी हेतू ठेवून कर्म करतो. पण प्रत्येक ठिकाणी ' भगवंताच्या इच्छेने काय व्हायचे आहे ते होऊ दे ', असे अनुसंधान असेल तर फलाविषयी सुखदुःख राहणार नाही. आपल्याला सगळे कळते, पण आयत्या वेळेला आपण विसरतो. आलेली ऊर्मी आपण सहन करावी. दिवा बरोबर नेला की अंधार नाहीसा होतो, तसे अनुसंधानाचा दिवा बरोबर न्यावा, म्हणजे आपण आपल्या ऊर्मींना आवरू शकू. प्रत्येकाचा रोग निराळा असला तरी औषध एकच आहे, ते म्हणजे भगवंताचे अनुसंधान. हे औषध जरी चांगल्या डॉक्टरकडून घेतले, तरी रोग्याला पथ्ये सांभाळावीच लागतात. शास्त्राने, सद्धर्माने आणि अभ्यासाने वागून अनुसंधानात राहणे जरूर आहे. अनुसंधानाने जे साधेल, ते शतकोटी साधनांनी साधणार नाही. असे अखंड नामानुसंधान म्हणजेच खरी भक्ती.

**२४०. इतर साधनांनी जे साधायचे ते नुसत्या अनुसंधानाने साधते, हाच या युगाचा महिमा आहे.**

## गुणरूपनिरसन



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

रूपांमध्ये बदल होतो पण नावामध्ये बदल होत नाही. नाम म्हणजे वस्तूंचे अंतरंग ते जाणीवमय व सुक्ष्म शक्तिमान असते. रूपांमध्ये बदल होतो पण नामामध्ये बदल होत नाही. जाणीवेतून जिवंतपणा आणि जीवंतपणातून मन प्रगट होते. वस्तूला अथवा प्राण्यांच्या शरीरातील जाणीव व्यापून रहाते.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २९ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# शेतमालाच्या आधारभूत किंमतीसाठी 'ट्रॅक्टर रॅली'

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीला वैधानिक दर्जा व देशातील शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कृषी कर्जमुक्ती मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्ष व शेतकरी संघटनेच्या वतीने अड्.अजित काळे व प्रहारचे जिल्हाध्यक्ष अभिजित पोटे यांच्या नेतृत्वात मंगळवारी आज ता.२७ फेब्रुवारी रोजी नेवासे ते श्रीरामपूर 'ट्रॅक्टर-ट्रॉली रॅली' आंदोलन करण्यात आले होते.त्याला शेतकऱ्याचा मोठा प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती हाती आली आहे.

शेतकऱ्यांच्या कृषी मालाला किमान आधारभूत किंमती (एम.एस.पी) च्या कायदेशीर हमीबद्दल शेतकऱ्यांच्या,'दिल्ली चलो'आंदोलनाला देशभरातून पाठींबा लाभत असून कर्जमाफीचा पाठिंबा,एम.एस.पी.कायदा आणण्यात अवास्तव विलंब झाल्यामुळे संतप्त अ.नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अड्.अजित काळे व प्रहार संघटनेच्या नेतृत्वात आज नेवासा ते श्रीरामपूर येथील प्रांत कार्यालयावर ही,'ट्रॅक्टर रॅली आज दुपारी आयोजित केली होती.

त्यावेळी पोलिसांनी श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे हा मोर्चा अडवण्यात आला.यावेळी शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड अजित काळे,जिल्हाध्यक्ष अनिल औताडे,संपर्कप्रमुख शिवाजी जवरे,प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पोटे,युवराज जगताप यांची पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्याबरोबर बाचाबाची झाली असल्याची माहिती हाती आली आहे.

यावेळी राज्य राखीव दलाची तुकडी तैनात करण्यात आली होती.दिल्ली येथे सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि विविध मागण्यांसाठी ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्चात शेकडो ट्रॅक्टर सहभागी झाले होते.हा मोर्चा नेवासेहून सकाळी निघून श्रीरामपूर येथे दुपारी श्रीरामपुरात दाखल झाला.शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून दुग्धाभिषेक करण्यात आला त्यानंतर ही रॅली पुढे मुख्य रस्ता शिवाजी रस्त्याने झाली प्रांत कार्यालयावर दाखल झाली या ठिकाणी दोन्ही संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

दरम्यान श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शेतकरी आंदोलन आणि पोलिसांमध्ये बाचाबाची नेवासा श्रीरामपूर वरून येणाऱ्या ट्रॅक्टर मोर्चा पोलिसांनी श्रीरामपूरच्या वेशीवर अडवला. यावेळी आंदोलकांची पोलिसांसोबत बाचाबाची झाली झाली.शेतकरी आंदोलकांनी फक्त २० ट्रॅक्टर शहरात न्यावेत अशी विनंती केली.परंतु आंदोलकांनी सर्वच ट्रॅक्टर नेणारच अशी भूमिका घेतली.याप्रसंगी केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करीत प्रांताधिकारी किरण सावंत व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांना निवेदन देण्यात आले आहे.





# धुळ्यात सेक्युलर परिषदेचे यशस्वी आयोजन

## शहरासाठी 16 राजकीय पक्ष, 30 सामाजिक संघटना एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरामध्ये बुधवारी सेक्युलर परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. धुळ्यात जातीयवादी लोकांच्या विरोधात सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयोग यशस्वी झाला. सेक्युलर परिषदेमध्ये 16 धर्मनिरपेक्षक राजकीय पक्ष,30 सामाजिक संघटना, विचारवंत, बुद्धिजीवी, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते आदींनी सहभाग घेतला. असे सेक्युलर परिषदेचे समन्वयक श्री रणजीत राजे भोसले यांनी कळविले आहे.

सेक्युलर परिषदेची सुरुवात महापुरुषांना पुष्पहार घालून करण्यात आली. सेक्युलर परिषदेचा मुख्य उद्देश जातीवादी, कट्टरपंथी लोकांना रोखणे. शहरांमध्ये अमन, एकता, शांती निर्माण करणे.सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणून एकात्मता वाढविणे. सोशल मीडियावरील दुष्प्रचारला उत्तर देणे. हाच मुख्य उद्देश होता. भविष्यात होणाऱ्या निवडणुका, राजकीय उलथा पालट यामुळे धर्मांध, जातीवादी लोक समाजातील वातावरण बिघडण्याचे काम करू शकतात. काही कट्टर पंथीय विविध जाती धर्मातील लोकांच्या मनामध्ये द्वेष,मत्सर निर्माण करू शकतात. शहर हे सर्व जाती धर्मांनी बनलेले आहे.धुळे शहरांमध्ये विविध जाती, धर्माचे,पंथाचे विचाराचे लोक एकत्र गुण्या गोविंदाने राहतात. विविध जाती धर्मातील सण उत्सव एकमेकांसोबत साजरी करतात. एकमेकांच्या सणांमध्ये उत्साहाने सहभागी होतात.हे आपल्या भारतीयांचे वैशिष्ट्य आहे. हाच उद्दिष्ट ठेवून सर्वांनी एकत्र येऊन आपल्या शहराचा विकास केला पाहिजे. या हेतूने धुळे शहरांमध्ये सेक्युलर परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते. या परिषदेमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,राष्ट्रसेवा दल, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उबाठा,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, संविधान बचाव समिती,जमियत ए हिंद, सत्यशोधक विद्यार्थी संघटना,वंचित बहुजन आघाडी, मराठा सेवा संघ, बामसेफ, समाजवादी पार्टी,आम आदमी पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, भारतीय बौद्ध महासभा, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, हरिजन सेवक संघ, छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती, शेतकरी कामगार पक्ष, जमाते इस्लामी, राष्ट्रीय जनता दल, जनसेवा मंच, भीम आर्मी, महाराष्ट्र एकलव्य आदिवासी संघटना, मल्हार महासंघ, शाहू महाराज संघर्ष समिती,संभाजी ब्रिगेड,वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया, बहुजन समाज पार्टी, समता समाज संघ, लोकसेवा ग्रुप,सर्वधर्मसंघ, भीम बुद्ध सिल्वर समिती, कॉरिडॉर विकास समिती, छात्र भारती, निसर्ग मित्र समिती, मराठी पत्रकार परिषद,युवा दक्ष पत्रकार संघ, साहित्यिक परिषद, पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, मुस्लिम ओबीसी संघटना, शिक्षक सभा, ओबीसी आरक्षण बचाव समिती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, अन्सारी सभा, राज्य कर्मचारी संघटना, परिवर्तन फाउंडेशन, भीम शक्ती संघटना, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार फोरम, दक्ष नागरिक संघ,इत्यादी संघटनांनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला.

या परिषदेमध्ये मोहम्मद समी,ब्रह्मकुमारी रिटा दीदी,माजी आमदार शरद पाटील,डॉक्टर अनिल पाटील,डॉक्टर सर्फराज अन्सारी,हितेश पवार, गुड्डू काकर ,खलील अन्सारी,रमेश श्रीखंडे, दरबारसिंग गिरासे, साबीर शेख, शाम सनेर, किरण जोंधळे, राज चव्हाण,योगेश जगताप,भैय्या परेराव, एडवोकेट संतोष जाधव, राहुल वाघ, विशाल साळवे, जमील मंसूरी,एडवोकेट इम्रान शेख, अविनाश पाटील, हेमंत मदाणे, हरिचंद्र लोंढे,पोपटराव चौधरी, एडवोकेट एल आर राव, एडवोकेट जुबेर शेख, मधुकर शिरसाट, हेमंत भडक, सवाल अन्सारी, अतावू रहेमान, सत्तार शहा, इस्माईल पठाण, भानुदास बगदे, विनोद जगताप,नाना कदम,अर्जुन पाटील, डॉक्टर संजय पाटील, आप्पासाहेब तायडे,आनंद लोंढे, सुनील लोंढे, बाबा हातेकर, योगेश इशी,हिरालाल सापे,आनंद सैंदाणे,मोहम्मद जैद, दीपक सोनवणे,संजय चव्हाण,अशोक धूळकर, अण्णा सूर्यवंशी,नितीन गायकवाड, अनिल दामोदर, नजनीन शेख, सिद्धांत बागुल, इशाक शेख, डॉक्टर पापालाल पवार, बी टी अहिरे,देविदास जगताप,सुरेश बैसाणे, राकेश अहिरे, ईश्वर चौधरी, सचिन सोनवणे, सरफराज अन्सारी, शंकर खरात, जाकीर शहा,गोपाल माने, गोपी लांडगे, अश्फाक वकील, राजू पठाण, डॉक्टर अन्वर हुसेन, इजाज काजी, अश्फाक शेख,श्रावण अण्णा खैरनार, प्रेम कुमार अहिरे, विजय महाले, जितेंद्र खैरनार, रिया उद्दीन काजी, मधुकर शिरसाट, दिनेश चव्हाण, रवींद्र खैरनार, एसी चौधरी, सुनंदा भामरे, मोहम्मद तांबोळी,, राजेंद्र पवार, दिलीप मोहिते, यशोदा तायडे, राजेंद्र खैरनार, आयुब खाटीक, भैय्यासाहेब पाटील, रमेश पवार, अनिल देवपूरकर, रवी नगराळे, दिलीप देवरे, नवल ठाकरे, नानासाहेब देवरे, बी. यु. वाघ, रवींद्र खैरनार, हर्ष मोरे,यांनी चर्चामध्ये भाग घेऊन आपले विचार मांडले.

# श्री भगवान विद्यालयास २५ संगणक भेट

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मराठे**

**शेवगाव :** तालुक्यातील श्री भगवान माध्य व ऊच्च माध्यमिक विद्यालयास माजी विद्यार्थी ,युवा ऊद्योजक श्रेयस जयराम गरुड यांनी वडील स्व.जयराम श्रीपतराव गरुड यांचे स्मरणार्थ २५ संगणक व प्रिंटर भेट दिले आहेत. श्रेयश गरुड हे भगवान विद्यालयाचे सन२०१७/१८एस एस सी बँचचे विद्यार्थी आहेत. अतिशय शांत शिस्तप्रिय विद्यार्थी म्हणुन शिक्षकांना परीचित आहेत त्यांनी स्वकष्टाने उद्योग क्षेत्रात भरारी घेतली आहे. आर्थीक प्रगतीच्या ऊंच शिखरावर असतानाही विद्यालयातील संस्कार व निष्टा विसरले नाहित शाळेच्या प्रती आसलेली निष्टा प्रेम व आपुलकीची भावना असल्याने परिसरातील विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण मिळावे या साठी विद्यालयात असलेल्या संगणक विभागास २५संगणक व प्रिंटर भेट दिले आहेत. या प्रसंगी श्रेयस यांचे प्राचार्य ऊत्तम रक्टे यांनी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. श्रेयस गरूड यांचे रंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ आणे या संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाशजी बोरा,संचालक श्री जितेंद्र बोरा यांनी अभिनंदन केले आहे. श्रेयस यांनी शाळेतील अनुभव व्यक्त केले तर रामेश्वर वडघणे प्राचार्य उत्तम रक्टे यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी राजकुमार तोतरे, भास्कर आंधळे, कल्याण मापारे, रोहित बंड, आदित्य बंड, सुनिल गायकवाड, कृष्णा भोसले , विद्यालयाचे प्राचार्य उत्तम रक्टे पर्यवेक्षक लक्ष्मण गागरे सह सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्र संचालन राजेंद्र मराठे सर यांनी केले तर आभार पर्यवेक्षक लक्ष्मण गागरे यांनी मानले.



# चव्हाण यांना वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार'

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील



सुलतानपूर येथील प्रगतिशील व प्रयोगशील शेतकरी दीपक पांडुरंग चव्हाण या तरूण शेतकऱ्याने कृषि क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पशसंवर्धन विभागातर्फे कृषी क्षेत्रातील प्रतिष्ठित असा ' वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार' सन 2021 साठी उच्च शिक्षित शेतकरी श्री.दीपक पांडुरंग चव्हाण सुलतानपूर तालुका खुलताबाद ,यांना नुकताच जाहीर झाला आहे ,हा पुरस्कार मिळणारे दीपक चव्हाण हे खुलताबाद तालुक्यातील प्रथम शेतकरी आहे. दीपक चव्हाण यांनी सन 2007 साली विज्ञान शाखेत पद्युत्तर पदवी घेवून गोवा येथे 2 वर्ष नोकरी केली ,त्यानंतर पूर्णवेळ शेती करण्याचा निर्णय घेतला सन 2013 पासून त्यांनी शेती क्षेत्रामध्ये मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चांगल्या प्रकारचे उत्पादन घेण्याचे सातत्य ठेवले आहे , व शेती क्षेत्रामधून चांगल्या प्रकारचे करियर घडू शकते हे अनेक वेळा सिद्ध करून दाखविले आहे कुटुंबातील मधले बंधू सुभाष व वडील पांडुरंग चव्हाण यांना शेती मध्ये मदत करतात दीपक चव्हाण यांचे मुख्य पिक अद्रक असून त्यांनी आद्रक पिकाच्या उत्पन्नातून चांगली आर्थिक प्रगती साधली आहे. व शेतीतील नव तरुणांसाठी एक आदर्श घडविला आहे. दीपक चव्हाण यांच्याकडे सध्या बारा एकर अद्रक तसेच पंधरा एकर क्षेत्रावर भाजीपाला पिके आणी १३ एकर क्षेत्रावर कांदा पीक घेतले आहे सर्व 50 एकर क्षेत्रावर ठिबक सिंचन केले आहे व दीड एकर क्षेत्रावर २ कोटी लीटर क्षमतेचे शेततळे केले आहे.दीपक चव्हान हे स्वरूप शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक असून शेतकरी कंपनीच्या माध्यमातून त्यांनी धान्य स्वच्छ्ता व प्रतवारी केंद्र, कृषी औजारे बँक, गोदाम बांधकाम, कांदा चाळ असे अनेक उपक्रम राबविले आहेत.

दीपक चव्हाण यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळालेले असून शासनाचा शेतीनिष्ठ शेतकरी, वसंतराव कृषी प्रतिष्ठान चा आदर्श शेतकरी पुरस्कार व सिंचन परिषदेचा उत्कृष्ठ शेतकरी असे अनेक पुरस्कार मिळाले आहे. सदर कृषीभूषण पुरस्काराचे स्वरूप हे दोन लाख रूपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह तसेच शाही पुरस्कार समारंभ असे आहे. दीपक चव्हाण यांना कृषिभूषण पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# हिमाचलात राजकीय नाट्य

आधुनिक केसरी

राज्यसभा निवडणुकीत झालेल्या क्रॉस वोटिंगमुळे हिमाचल प्रदेशची सध्या देशभर चर्चा चालू आहे. राज्यात मंगळवारपासून मोठं राजकीय नाट्य पाहायला मिळत आहे. काँग्रेसचे राज्यसभेचे उमेदवार अभिषेक मनु सिंघवी यांचा भाजपाच्या हर्ष महाजन यांनी पराभव केला. हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसचा विजय स्पष्ट होता. परंतु, तरीही भाजपाच्या उमेदवाराला सर्वाधिक मतं मिळाल्याने काँग्रेसचा पराभव झाला. परिणामी हिमाचल प्रदेशमध्ये क्रॉस वोटिंग झाल्याचं स्पष्ट झालं आहे. तर, मंत्री विक्रमादित्य सिंह यांनी काँग्रेसवर आरोप करत मंत्रिपदाचा राजीनामा दिला. तर, दुसरीकडे भाजपाने राज्यपालांची भेट घेऊन बहुमत चाचणीची मागणी केली आहे. त्याचबरोबर, भाजपा आमदारांनी विधानसभेत गोंधळ घातल्याने १५ भाजपा आमदारांना निलंबित करण्यात आलं आहे. गेल्या २४ तासांत राज्यात या तीन घडामोडी घडल्या आहेत. त्यापाठोपाठ विरोधकांनी आणखी एक दावा करत मोठा राजकीय स्फोट केला आहे. हिमाचलचे माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे विरोधी पक्षनेते जयराम ठाकूर यांनी सभागृहाबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना दावा केला की, मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांनी राजीनामा सादर केला आहे. राज्याच्या राजकारणात चालू असलेली उलथापालथ पाहून सुखविंदर सिंह सुक्खू यांनी आपलं पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची चर्चा सुरू झाल्यानंतर स्वतः सुखविंदर सिंह सुक्खू यांनी या सर्व वृत्तांचं आणि दाव्यांचं खंडण केलं आहे. आज दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भाजपा आमदार सभागृहात दाखल झाले. त्याचवेळी काही मार्शल तिथे आले आणि त्यांनी सर्व आमदारांना घेरलं. त्यानंतर मार्शल एकेका आमदाराला घेऊन बाहेर जाऊ लागले होते, असा दावा काही भाजपा आमदारांनी केला आहे. तसेच त्यांनी आरोप केला आहे की, मुख्यमंत्री विरोधकांविरोधात बळाचा वापर करू लागले आहेत. विरोधकांच्या आरोपांवर मुख्यमंत्री म्हणाले, मी कुठल्याही प्रकारच्या बळाचा वापर केलेला नाही. उलट ते लोकच सैन्यबळाचा, सीआरपीएफचा वापर करत आहेत. ते लोक सर्व आमदारांना सीआरएफच्या गाडीत भरून कुठेतरी घेऊन जात आहेत. परंतु, अशाने मी घाबरणारा माणूस नाही. आजच्या अधिवेशनात बहुमत चाचणी होईल आणि या बहुमत चाचणीत काँग्रेस विजयी होईल. विधानसभा अध्यक्षांनी दुपारी दोन वाजेपर्यंतची वेळ दिली आहे. त्यानंतर मी सर्व प्रसारमाध्यमांशी बातचीत करेन. राजीनाम्याच्या वृत्तावर प्रतिक्रिया देताना सुखविंदर सिंह सुक्खू म्हणाले, विरोधी पक्ष माझ्या राजीनाम्याची अफवा उडवत आहेत. जेणेकरून आमच्या आमदारांमध्ये अशांतता निर्माण होईल किंवा आमचे आमदार फुटतील. माझ्या राजीनाम्यानंतर पक्षातील लोक सोडून जातील असं त्यांना वाटत असावं. परंतु, काँग्रेस पक्ष एकसंघ आहे. काही लहान-मोठ्या अडचणी आहेत ज्या लवकरच सोडवल्या जातील. सुखविंदर सिंग सुखू सरकारने आपल्याच आमदारांचा अनेक वेळा अपमान केला, असा आरोप करत काँग्रेस आमदार विक्रमादित्य सिंह यांनी बुधवारी सकाळी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. ते पुढे म्हणाले, “आता हिमाचलमध्ये काँग्रेस पुढे कोठे आहे हे पक्षाच्या हायकमांडला ठरवायचे आहे. लोकांनी मतदान केले म्हणून ते सरकार वाचले पाहिजे अशी आमची इच्छा आहे.



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

# ओळखलत का सर मला ?

आधुनिक केसरी

**मराठी साहित्य क्षेत्रातील कवीचे कवी म्हणून ओळखले जाणारे कुसुमाग्रज यांचा 27 फेब्रुवारीजन्म दिन आहे. त्यांना जननी व जन्मभूमी ही स्वर्गापेक्षा महान वाटत होती. क्रांतिकारकांना त्यांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातून एखादा नवीन कवी काव्य घेऊन घरी आला असेल तर ते वाचून पहात. कधी कोणाचा त्यांनी अपमान केला नाही. चार शब्द समजावून सांगून त्यांच्या मनात परिवर्तन करत असत. कधीही कोणाला वाईट वाटेल असे ते बोलले नाहीत. त्यांनी केलेल्या मराठी साहित्यातील कार्याचा आढावा आपण या लेखात करून घेऊ त्या निमित्ताने लिहिलेले दोन शब्द. ...**

आधुनिक मराठी साहित्यातील कुसुमाग्रज हे एक समाजाभिमुख व प्रतिभावंत लेखक आहेत. त्यांच्या लेखणीतून त्यांनी समाजा कडून आपुलकी मिळवली. प्रत्येक व्यक्तीला वाटत असे की ते आपलेच आहेत असे प्रत्येकाच्या मनात एक गोडवा उत्पन्न केले, समाजात जीवन जगताना एक चांगला व्यक्ती म्हणून ते नावारूपाला आले .तळागाळातील माणसापर्यंत त्यांचे विचार पोहोचले. आज भारतातील अनेक विद्यापीठात यांनी लेखन केलेल्या साहित्याचा अभ्यास सुरू आहे. जीवनदृष्टी व वाङ;मय दृष्टी यांची एकात्मता साक्षात निर्माण करणारा साहित्यिक, लेखक म्हणून समाजात त्यांचे स्थान उठून दिसते तर त्यांच्या साहित्याचा अभ्यास जवळजवळ प्रत्येक विद्यापीठात विद्यार्थ्यांनी ठेवलेला आहे. भगवद्गीता, संत तुकाराम महाराजांचे काव्य. कालिदासाचे मेघदूत आणि उमर खय्यामची रुबाईत फार मोठा संस्कार कुसुमाग्रजांच्या कवी मनावर आहे .ससा जरी चपळ असला तरी शर्यत ही कासवानी जिंकली आहे. जिद्दी माणसे जिद्दी मिळवतात मग प्रसिद्धी आपोआप पाठीमागे चालत येते. असे ते म्हणतात सामाजिक अन्याय व विषमता या विषयावर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लेखणीतून कठोर टीका केली .साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे. केशवसुत व कुसुमाग्रज यांच्या सामाजिक विचारांची नाते परस्पर संबंध जुळणारे आहे. साहित्य निर्मिती ही त्यांची जीवननिष्ठा ठरली आहे. बोले तसे चाले। त्याची वंदावी पावले या उक्तीप्रमाणे कुसुमाग्रजांचे जीवन आणि साहित्य यांचे अद्वैत नाते आहे. कुसुमाग्रजांच्या नंदनवनात मानवतेला, करूणेला स्वातंत्र्याला आणि सामाजिक समानतेला अनन्य साधारण स्थान आहे.

कुसुमाग्रजांनी लिहिलेली कणा ही कविता आजही सर्वांना ताजी व मनाला आधार देणारी वाटते. युवकांना तर ती स्फूर्ती व प्रेरणा देणारी ठरली आहे. त्या विद्यार्थ्यांची झालेली हुबेहुब अवस्था या कवितेत रेखाटले आहे, त्यांची कविता म्हणजे मराठी भाषेचा दागिना आहे ते कवीचे कवी आहेत .म्हणून त्यांचा जन्म दिन27 फेब्रुवारी हा मराठी भाषा दिन म्हणून आज सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.1987 मध्ये लिहिलेल्या नटसम्राट नाटकाला साहित्यातील सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ देण्यात आला, मराठी भाषेला समृद्ध करणारे ते साहित्यिक आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक वीरांनी आपले बलिदान दिले. इंग्रजांनी त्यांना फसवावर लटकवले त्यांच्या बलिदाना तून आपण स्वतंत्र झालो. म्हणून एका कवितेतून कुसुमाग्रज म्हणतात. तुम्ही जातीभेदा विरुद्ध कायदे केले आहेत. परंतु प्रत्यक्षपणे जातीभेद आहेतच. यासाठी तुम्ही तुमच्या मनातून जातीबद्दलचे विषमतेचे विष काढून टाका. तरुणाचे बळ हे खरे देशाचे बळ आहे. देशाचा विकास करण्याची जबाबदारी तरुणांची आहे.तरुणच देशाचा विकास करू शकतात. परंतु सध्याचा तरुण वर्ग करमणुकीच्या गटारगंगेत वाहून जातो आहे , आणि तरुण व्यसनामुळे वेडे झाले आहेत. तरुणांच्या हाती जोपर्यंत जिद्द. चिकाटी अपार मेहनत. अहोरात्र कष्ट करण्याची तयारी असल्यास तुमचे कार्य अतुलनीय होईल.

स्वालंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही यशाची चतुःसूत्री आहे. कधीही यशाची वाट पाहत बसू नका.



प्रयत्न करत रहा. विश्वास ही सर्व यशाची सर्वात मोठी पुंजी आहे. यशाची पायरी चढताना पराभवाचे सामना करावा लागतो. प्रत्येक जण आयुष्याच्या शेवटपर्यंत विद्यार्थी असतो. नवनवीन ज्ञान आत्मसात करा. अशी संजीवनी कवी कुसुमाग्रज आपल्या विद्यार्थ्यांना अध्यापनातून देतात म्हणूनच ते आज सर्वांच्या हृदयात आहेत ज्ञानपीठ विजेते असून देखील कधी त्यांना अहंकार दाखवलेला नाही. मोठ्या लोकापेक्षा साधी भोळी माणसं जास्त जवळची वाटायची, बारा बलुतेदार लोकांसोबत त्यांचे मैत्रीचे संबंध निर्माण केले होते. स्वतःचा अपमान झाला कोणी मुद्दाम हून केला ;तरी त्यांनी विरोध केला नाही अनेक साहित्यिक त्यामुळेच त्यांना तुकाराम म्हणून संबोधतात. त्यांनी अनेक कवी, लेखक साहित्यिक घडविले .पेपरला लेख पाठविल्यानंतर ते लिहीत असत, संपादक साहेब पसंत आला तरच छापावे असे रोखठोक बोलणारे कुसुमाग्रज होते. कधी त्यांनी कोणाचे काही फुकट घेतले नाही. नटसम्राट लिहून लोकांच्या घराघरात ते पोहोचले कोणी घर? देता का घर? हे वाक्य तर महाराष्ट्रातल्या अनेक व्यक्तीला तोंडपाठ झाले आहे. एके दिवशी कुसुमाग्रज विद्यार्थ्यांना म्हणाले, "यशाचे शीतल चांदणे तुम्हाला हवे असेल तर प्रयत्नाचा चंद्र अखंड ठेवलाच पाहिजे, जीवनात तुम्हाला काही साध्य करायचं असेल तर दोन गोष्टीची आवश्यकता असते. एक ध्यास व दुसरा अभ्यास होय." स्वतःच्या मनगटावर विश्वास असणाऱ्याला दुसऱ्याच्या सामर्थ्याची भीती कधीच वाटली नाही. यशाची पायरी चढताना पराभवाचाही सामना करावा लागतो. पराभवाने माणूस कधीही संपत नाही प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. ज्ञान हे वाहत्या पाण्याच्या झऱ्यासारखे असते. म्हणून ते निर्मळ ठेवण्याचा सतत प्रयत्न करावा असे मार्गदर्शन ते समाजाला करतात. प्रखर शक्ती ही प्रोत्साहन देणारी व ध्येयापर्यंत नेणारी ठरते. अशा प्रकारची अमृतवाणी ते आपल्या विद्यार्थ्यांना देतात, त्यामुळे आजही त्यांच्या साहित्याचा अभ्यास सर्व विद्यापीठात केला जातो .आजही त्यांची कणा ही कविता मराठी माणसाच्या मनात गुणगुणत असते,

**ओळखलत का सर मला**
**पावसात आला कोणी,**
**कपडे होते कर्दमलेले,**
**केसांवरती पाणी**
**क्षणभर बसला, नंतर हसला**
**बोलला वरती पाहून**
**गंगामाई पाहुणी आली**
**गेली घरट्यात राहून'**

या कवितेतून आज आपल्याला बरंच काही शिकायला मिळते. म्हणून मराठी भाषा साठी कुसुमाग्रजांनी केलेला कार्य अजरामर आहे त्यासाठी सर्वांनी आपण मराठी भाषेची सेवा करावी. संवर्धन करावं ,मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी मराठी साहित्य वाचन करणे गरजेचे आहे ,अखिल भारतीय साहित्य संमेलन दरवर्षी भरवले जातात .त्यातून मार्गदर्शन केलं जाते ते मराठी माणसाच्या घराघरापर्यंत पोहोचावेत,मराठी साहित्याकडे तरुणांने पाठ फिरू नये. बऱ्याच जणांना मराठी भाषा म्हटलं की हसू येते, कारण सध्या जीवन जगण्याची भाषा इंग्रजी झाली आहे. त्यामुळे काही प्रमाणात मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत आहे .ते होता कामा नये असे मला वाटते, देशप्रेम,राष्ट्रप्रेम यांचे अनेक मोहक रूप तात्यासाहेबांनी कवितेच्या माध्यमातून मांडले, विपुल अशी साहित्य संपदा त्यांनी निर्माण केली. अनेक कथा ,कादंबऱ्या, कविता लिहिल्या, नाटके ,एकांकिका वेगवेगळे प्रबंध लिहून मराठी भाषा समृद्ध केली ,अशा या महान साहित्यिकांचा मृत्यू 10 मार्च 1999 रोजी झाला, शरीराने ते स्वर्गवासी झाले तरी त्यांचे विचार सदैव प्रेरणादायी आहेत,त्यांच्या विचाराचा जागर करून आपण सर्वांनी मराठी भाषा समृद्ध करू या, तेव्हाच त्यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# गझल सम्राट; पंकज उधास

आधुनिक केसरी

**आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील आणखी एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली.**

घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली.व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# इंडियन ओवर्सिस काँग्रेसचे शिष्टमंडळात विद्या कदम यांनी केले कॅनडाचे प्रतिनिधित्व

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** काँग्रेस पक्षाचे युवा नेते राहुल गांधी हे भारत जोडो न्याय यात्रा काढून जनतेशी संवाद साधत असून सध्या उत्तर प्रदेशमध्ये ही यात्रा सुरू आहे. या वेळी अमेठी येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमी येथे राहुलजी गांधी यांनी सॅम पित्रोदा हे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या इंडियन ओवर्सिस काँग्रेस पक्षाच्या अंतरराष्ट्रिय अध्यक्षाच्या भेटण्यासाठी वेळ दिला होता यावेळी अमेरिका, लंडन, जर्मनी, कॅनडा अश्या अनेक देशाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी कॅनडाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगदीप साचा यांच्या प्रमुख मार्गदर्शनात श्रीमती विद्या कदम यांनी ब्रिटिश कोलंबिया कॅनडाचे प्रतिनिधित्व करून आपला कार्य अहवाल सादर केला व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनिवासिय भारतीय काग्रेसचे प्रदेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचे सांगितले त्यावेळी राहुलजी गांधी यांनी श्रीमती विद्या कदम यांच्या कार्याचे कौतुक केले व असेच जोमाने काम करा असा आदेश दिला व आपणास अजून मोठी जबाबदारी देण्यात येईल असे असे अश्वासित केले. प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी महाराष्ट्र राज्यात पहिला एन. आर. आय. सेल सुरू करून, पाहिला अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्या बद्दल नानाभाऊ पटोले यांचे ही कौतुक करून श्रीमती विद्या कदम यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रीय सरचिटणीस, अनिवसिय भारतीय सेलच्या व्हा. चेअरमन कॅबिनेट मंत्री दर्जा श्रीमती आरती कृष्णन, आय.वो. सी.चे समन्वयक महेफुज आलम, अमेरिकेचे अध्यक्ष मोहिंदर सिंग, वॉशिंग्टनचे अध्यक्ष अखलाक अहमद आय.वो. सीचे समन्वयक व राहुल गांधी यांचे कार्यक्रम प्रमुख मनोज त्यागी,सुखविंदर सिंग आदी हजर होते.



## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६७वे

भावनांची महती । दगडाची मुर्ति ।
देव बनते । म्हणती महाराज ।। १ ।।
शुद्ध भावना मनी असती ।
वसे अंतरात भक्ती ।
चैतन्य लहरी प्रकटती ।
सभोवार ।। २ ।। परमात्म्याची रुपं असती ।
दिसती विविध जरी ती ।
श्रीशंकर, श्रीकृष्ण एकच असती ।
महाराज सांगती,
भक्त विष्णुपंता ।। ३ ।।
सामान्य माणसानं । जावं भगवंता शरण ।
करावे नामस्मरण। जाते वासना आपोआप,
महाराज म्हणती।।४।।
संतांपासुनी नाम घ्यावे । आवडीने नाम घ्यावे
। मना समाधानी करावे । सांगणे महाराजांचे
भक्तांना ।। ५ ।।
घडता सत्संगति । तेंव्हा नामी वृत्ती गुंगती ।
सहज पालटे मती । ही महती नामाची ,सांगती
श्रीमहाराज ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# जिंतूर शहरातील रोडरोमियोचा बंदोबस्त करा अन्यथा आम्ही करू

## संभाजी ब्रिगेडची पोलीस निरीक्षकांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरात दिवसेंदिवस रोडरोमिओंचा सुळसुळाट झाला असून भरदिवसा मुलींची छेड काढणे, मारहाण करणे या घटनेत वाढ झाली आहे परिणामी रोडरोमिओंमुळे मुलींच्या शिक्षणावर परिणाम होत आहे म्हणून येत्या काही दिवसात पोलिसांनी दामीनी पथक तयार करून रोडरोमिओंचा बंदोबस्त करावा अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने महिला मुलींच्या संरक्षणासाठी पुढाकार घेऊन बंदोबस्त करण्यात येईल असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने दिनांक 28 फेब्रुवारी रोजी पोलीस निरीक्षक यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. ग्रामीण भागातून विद्यार्थिनी शिक्षणासाठी शहरात येत असतात शहरातील यलदरी रोड, हुतात्मा स्मारक, बलसारोड, शिवाजीनगर,संभाजीनगर या भागात शाळा महाविद्यालय तसेच शिकवणी वर्ग मोठ्या प्रमाणात आहेत मात्र मागील काही दिवसांपासून रोडरोमियो कडून मुलींच्या छेडछाडीच्या घटनेत वाढ झाली आहे यामुळे मुलींच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निवेदनात म्एहटले आहे. एकीकडे राज्य सरकार मुलीच्या शिक्षणासाठी विविध योजना राबवत आहे तर दुसरीकडे शहरात रोडरोमियो मुळे मुलीना शिक्षण थांबवण्याची वेळ येत आहे याला दुर्दैवच म्हणावे लागेल. मागील वर्षांपूर्वी शहरात पोलिसांच्या मार्फत दामिनी पथक, चिडीमार पथक स्थापन करण्यात आले होते मात्र सध्या पोलीस प्रशासनाकडून गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आगामी काळात शाळा,महाविद्यालय, शिकवणी परिसरात चिडीमार पथक किंवा दामिनी पथक स्थापन करून त्यांचे संपर्क क्रमांक सार्वजनिक करावे यामुळे कुठे छेडछडीच्या प्रकाराला आळा घालावा अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने महिला मुलींच्या संरक्षणासाठी पुढाकार घेऊन रोडरोमिओंचा बंदोबस्त करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर जिल्हाध्यक्ष माजी सैनिक बालाजी शिंदे, बाळासाहेब काजळे, तालुका अध्यक्ष अँड माधव दाभाडे, शरद ठोंबरे, सुनिल गाडेकर पिंटू डोंबे, संजय गायके, लक्ष्मण कवडे,संतोष शिंदे, अनिल गाडेकर, अनिल दाभाडे,बापू भांबळे, बालू थिटे, पिंटू रोकडे, भगवान रोकडे, विजय पाटील यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते.



# गोकुळसिंग राजपूत यांना छत्रपती सेवा गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** शिवतीर्थ जळकी बाजार येथे ३५० उभयवंतांच्या हस्ते सामूहिक शिव छत्रपती यांची महाआरती करुन "छत्रपती सेवा गौरव पुरस्कार" देऊन शिवजन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे दुसरे मंदिर असलेल्या शिवतीर्थ जलकीबाजार येथील शिव जन्मोत्सवाकडे सपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असते,दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या जल्लोषात,शिव जन्मोत्सवचे नियोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 350 व्या राज्यभिषेक पर्वकाळाचे औचित्य लक्ष्यात घेवून 350 उभयवंताच्या हस्ते सामूहिक महा आरती ने उत्सवास सुरुवात झाली,त्याच बरोबर दरवर्षी प्रमाणे समाजात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या बऱ्याच व्यक्तिमतत्वाचा छत्रपती सेवा गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला यामध्ये प्रमुख्याने गोकुळसिंग राजपूत सावळदबारा यांना श्री महंत कृष्णागिरिजी महाराज, डॉ निलेश मिरकर,शिव व्याख्याते प्रदिप जगताप पाटील, डॉ शेखर दौड यांच्या हस्ते गोकुळसिंग राजपूत सावळदबारा यांना "छत्रपती पत्रकारिता सेवा गौरव पुरस्कार "देऊन सन्मानित करण्यात आले.यांनी पत्रकारिता क्षेत्रात निर्भिड,निस्वार्थ उल्लेखनीय कामगिरी ,व समाजाप्रती असलेली तळमळ लक्ष्यात घेवून , गोकुळसिंग राजपूत यांना या यंदाचा "छत्रपती पत्रकारिता सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.व मान्यवरांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याच बरोबर मंदिर समितीचे माध्यमातून आध्यात्ममिक जागरूकता बरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार तळागाळातील प्रतेक घटका पर्यंत पोहचविण्यासाठी हभप,सौ,संगीताताई व्यवहारे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज मंदिर समितीच्या असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते,शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी ,गावकरी,व महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.





# स्तंभलेखक संजय नलावडे यांना 'शिवांजली भूमिपुत्र सन्मान -२०२४' प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** महाराष्ट्रातील गुणवान साहित्यिकांचा गौरव करणारे विचारपीठ' असा लौकिक असलेल्या जुन्नर तालुक्यातील शिवांजली साहित्यपीठ व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा - चाळकवाडी, जुन्नर यांचे तर्फे यावर्षीचा 'शिवांजली भूमिपुत्र सन्मान - २०२४' धोलवड गावचे सुपुत्र स्तंभलेखक संजय नलावडे यांना नुकताच प्रदान करण्यात आला. कोविडकाळापासून सातत्याने काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे किंवा प्रसिद्धीपासून दूर राहिलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांची नवीन पिढीला 'शिवनेरीची श्रीमंती' या साहित्यकृतीतून संशोधनात्मक आणि सखोलपणे ओळख करून देण्याचे महत्वपूर्ण काम स्तंभलेखक संजय नलावडे यांनी केले आहे. ३१ व्या राज्यस्तरीय शिवांजली मराठी साहित्य महोत्सवात चाळकवाडी, पिंपळवंडी येथे ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस, माजी साहित्य संमेलनाध्यक्ष यांच्या शुभहस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार दत्तात्रय पाडेकर, भास्कर हांडे, ग्रामीण साहित्यकार मा. रा. लामखडे, इंजिनिअर शिवाजीराव चाळक आदी मान्यवर उपस्थित होते.

# साईभक्त राजेश्वर बुके यांच्याकडून साई संस्थानला १०१साखर पोत्याची देणगी

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा प्रती अतुट श्रध्दा मनोकामना पुर्ण होत असल्याने लातूर येथील उद्योगपती व श्री साईबाबा शुगर प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यास देखील २००६ साली नाव देत स्थानिक २०० बेरोजगार तरुणाच्या कुंटबाना शास्वत रोजगार देत त्याच्या जीवनात स्थिरता निर्माण करुण या परिसराच्या अर्थकारणात हातभार लावला आर्थिक काटकसर पारदर्शक व्यवहार यामुळे शेतकरी बांधवाना प्रतीटन २७०० रुपये असा चांगला भाव देखील दिला आहे या पाठीमागे साईबाबाचा आशिर्वाद असल्याची आपल्या कुंटबाची श्रध्दा आहे १७ वर्षापासून साईबाबा संस्थान भोजणालयात लाडु प्रसादासाठी प्रतीवर्ष १०१साखर पोते थेट शिर्डी येथे पोहच करत विधीवत पुजा करुन दान म्हणून देत असतो अशी माहिती कारखान्याचे मालक राजेश्वर वैजनाथराव बुके यांनी शिर्डी येथे विधिवत साखर पोत्याची पुजन करत साईबाबा संस्थानकडे सुपुर्द केले या प्रसंगी सागितले.
बुके बोलताना पुढे म्हणाले साईची अनुभुती व साईचा आशिर्वाद यामुळे लातुर येथील साईबाबा कारखान्याचा नावलौकिक वाढलेला आहे व तो प्रगतीपथावर आहे. यामागे साईबाबाचे असलेले पाठबळ यामुळे हे सर्व शक्य झाले आहे. या प्रसंगी जयश्री राजेश्वर बुके, शिवप्रसाद बुके निघोज येथील तुषार संपतराव मते, साईभक्त विनोद लासे, जालिंदर हाडोळे आदीसह मान्यवर उपस्थित होते.



# ग्रामीण रुग्णालयासाठी उर्वरित 2 कोटी रुपयांचा निधी

## आ. किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांना फलीत, अंतिम टप्प्यातील कामाला मिळणार गती

आधुनिक केसरी न्यूज



**घुग्घुस :** येथील ग्रामीण रुग्णालयाच्या अंतिम टप्प्यात असलेल्या कामाला गती देण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. परिणामी त्यांच्या प्रयत्नांना फलीत आले असून सदर बांधकामासाठी अर्थसंकल्पीय निधीमध्ये उर्वरित दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस नगरपरिषद अंतर्गत नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा प्राप्त होण्याच्या दृष्टीने घुग्घुस येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले होते. याकरिता 10 कोटी 55 लक्ष रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून घुग्घुस ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले. मात्र शासनाचा निधी रखडल्यामुळे सदर काम बंद पडले होते. घुग्घुस शहर कोळसा खाण व वाहतूक, लोह शुद्धीकरण प्रकल्प यामुळे सर्वाधिक प्रदूषित क्षेत्र आहे. त्यामुळे येथील नागरिकांना आरोग्याचा भीषण समस्या जाणवत आहे. त्यामुळे निर्माणाधीन घुग्घुस ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता सदर रुग्णालयाच्या कामासाठी उर्वरित निधी मंजूर करावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना केली होती. त्यानंतर सदर विकासकामासाठी 5 कोटी 26 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र यानंतरही मंजूर निधी पैकी दोन कोटी रुपयांचा निधी प्रलंबित होता. त्यामुळे सदर रुग्णालयाचे अंतिम टप्प्यात असलेले काम मंदावले होते.
या रुग्णालयाची येथे अत्यंत गरज आहे. त्यामुळे सदर काम वेळेत पुर्ण व्हावे यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी उर्वरित निधीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर त्यांच्या पाठपूराव्याला यश आले आहे. काल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अंतिम बजेट सादर केला. या बजेटमधील निधीमध्ये सदर रुग्णालयाच्या कामासाठी उर्वरित असलेला 2 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर रुग्णालयाचे काम लवकच पूर्ण होऊन ते नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. निधी मंजूर केल्या बदल आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उमुपख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार आरोग्य मंत्री ताणाजी सावंत यांचे आभार मानले आहे.



# मराठी ज्ञान व्यवहाराची भाषा झाली पाहिजे : प्रा. रंगनाथ लहाने

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** मराठी भाषेला समृद्ध वारसा व परंपरा लाभलेली आहे. मराठीत विपूल प्रमाणात ग्रंथ निर्मिती होते. अनेक संमेलने होतात, अनेक शिलालेख आहेत. ते प्राचीनत्व सिद्ध करते. दहा कोटी लोक मराठी भाषा बोलतात. आपली संस्कृती जपतात. बोलणे, लिहिणे व वाचणे मराठी भाषेत झाले पाहिजे. मराठी ही केवळ संवादाची भाषा न रहाता ती ज्ञान व्यवहाराची भाषा झाली पाहिजे असे प्रतिपादन प्रा. रंगनाथ लहाने यांनी केले.( ता. २७ ) येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभाग, मराठी संशोधन केंद्र आणि संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्रातर्फे मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमास ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते तर मंचावर उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती होती. प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. यावेळी प्रा. सोमेश्वर मोगरे यांनी कविता वाचन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. ते म्हणाले मराठी भाषा टिकावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. मराठी ही समृद्ध व गोडवा असलेली भाषा आहे. नविन शैक्षणिक धोरणात भाषेला महत्व प्राप्त होणार आहे. असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ. युसुफ शेख, डॉ. अनिल क्षिरसागर, डॉ. व्ही.पी. देशपांडे, डॉ. एस.बी. कोल्हे, डॉ. के.एल. भानुसे, डॉ.जे.व्ही. भेलोंडे, डॉ. रविंद्र घोती, डॉ. बी.जी. देशमुख, डॉ. संजय भालेराव, डॉ. गोवींद बुरसे, डॉ. विजय मातकर, डॉ.बी. एच. गायकवाड, डॉ . प्रशांत संघई, डॉ. सीमा काशिद यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.डॉ. रामचंद्र झाडे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# उमेद अभियानातून महिलांना जगण्याची नवी उमेद

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजुर :** ग्रामीण भागातील महिलांचा सामाजिक आणि आर्थिकस्तर उंचावून आत्मनिर्भर बनवण्यासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती उमेद अभियान राबवली जाते. यामार्फत ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. राजूर येथे संकष्टी चतुर्थी निमित्त उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या खाद्यपदार्थ विक्री केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.उमेद या उपक्रमातून महिलांना जगण्यासाठी नवी उमेद मिळण्यास मदत होत आहे.
सर्वप्रथम राजुरच्या सरपंच प्रतिभा भुजंग यांच्या हस्ते खाद्यपदार्थ विक्री स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.
यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, चांदई एक्कोचे सरपंच रामदास तळेकर,ग्रामसेवक प्रमोद पुंगळे,खैरे साहेब,तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे,सुमित सर, ज्ञानदेव ढाकणे विठ्ठल पुंगळे, एकनाथ शिंदे यांची उपस्थिती होती.
श्रीक्षेत्र राजुर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे.चतुर्थी निमित्त तसेच दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात. श्रीचे दर्शन झाल्यानंतर भाविक चहापान करून उपवासाचे फराळ खरेदी करतात. याचा फायदा महिला बचत गटांना व्हावा म्हणून चतुर्थी निमित्त भोकरदन पंचायत समिती उमेद अभियानांतर्गत सावित्रीबाई फुले ग्रामसंघाच्या माध्यमातून चांदई एक्को येथील महिलांनी साबुदाणा वडा, साबुदाणा खिचडी व चहा विक्री केंद्र सुरू केले.येथून पुढे राजूर येथे दर चतुर्थीला हा स्टॉल लावण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील महिला सामाजिक ,आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात हा त्यामागचा उद्देश आहे.
या उपक्रमासाठी ग्रामसंघ अध्यक्षा शिला मुळे,सचिव सागरबाई गवळी, कोषाध्यक्ष लिलाबाई तळेकर, व्हिओ मिरा गंगावणे,आयसीआरपी मिरा ढाकणे,जयश्री लिंगायत या महिलांनी श्रीक्षेत्र राजुर येथे खाद्यपदार्थ विक्री स्टॉल सुरु करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.



# आरोग्य शिबिर थांबवल्यामुळे हजारो रुग्ण उपचारापासून वंचित : शीतल भांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**



**हदगाव :** शासन आपल्या दारी योजने अंतर्गत मुख्यमंत्री जनकल्याण कक्षा कडून आरोग्य शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता परंतु राजकारण करत हा मेळावा बोटावर मोजण्या इतक्या स्थानिक च्या पुढाऱ्यांनी थांबवल्याने आरोग्य शिबिरातील उपचारापासून हजारो रुग्ण वंचित राहिले आहेत, यामुळे गोरगरीब आजारी १० हजार रुग्णांना फायदा झाला असता असे मत शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शितलताई भांगे पाटील यांनी व्यक्त केले. त्या वाळकेवाडी येथे नियोजित आरोग्य शिबिर राजकारण करत थांबवल्याप्रकरणी सदर मुद्द्यावर बोलत होत्या पुढे बोलतांना भांगे पाटील म्हणाल्या, हदगाव तालुक्यामध्ये मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांचे कडून शासन आपल्या दारी च्या माध्यमातून अनेक ठिकाणी आरोग्य शिबिर आयोजित केले होते या शिबिरात गोरगरीब गरजवंत रुग्णांना उपचार मिळवून अनेक जण व्याधीमुक्त झाले अनेकांवर शहरातील मोठ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याच पद्धतीने वाळकेवाडी येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, शिबिरात हजारो रुग्ण उपचार घेतील त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे, खासदार हेमंत पाटील यांचे नाव जनसामान्य माणसापर्यंत पोहोचेल याचा बाऊ करत, आमच्या समाजावर खासदार साहेबांनी अन्याय केला असे म्हणत काही मोजक्या तरुणांनी शिबिर करण्यास मज्जाव केला, याच ठिकाणी धार्मिक कार्यक्रम असल्याने कुठेही गालबोट लागू नये म्हणून स्थानिक चे पुढारी असलेले तटस्थ सरपंच प्रतिनिधी व उपसरपंचाच्या म्हणण्यानुसार सदर कार्यक्रम रद्द करण्यात आले परंतु यामुळे हजारो रुग्णांच्या आशेवर उपचारावर पाणी फिरले त्याचं काय? असाही सवाल त्यांच्याकडून उपस्थित केला जात आहे.

# जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा व्याडच्या इतिहासात प्रथमच सहलीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा व्याडची शैक्षणिक सहल किल्ले दौलताबाद, वेरुळ, अजिंठा शिर्डी, शनिशिंगणापूर, देवगड, घृष्णेश्वर, सिद्धार्थ गार्डन संभाजीनगर या ठिकाणी दिनांक 21 ते23 फेब्रुवारी 2024 पर्यंत आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या किल्ले आणि लेण्यांचे महत्त्व कळालं तसेच वेगवेगळ्या प्रकारची ठिकाणे पाहून महाराष्ट्राची भौगोलिक, प्राकृतिक परिस्थिती लक्षात आली आणि मुलांच्या ज्ञानामध्ये शैक्षणिक दृष्ट्या भर पडली विद्यार्थ्यांची विचार क्षमता, कल्पकता, चिकित्सकृती वाढीस लागण्याच्या दृष्टीने शैक्षणिक सहल ही महत्त्वाची आहे, अशा प्रकारचे वक्तव्य श्री संतोष बिल्लारी सर यांनी केले. या सहलीचे आयोजन शाळेचे विषय शिक्षक श्री बिल्लारी सर यांनी केले होते शाळेचे मुख्याध्यापक श्री झुंगरे सर यांनी तात्काळ होकार देऊन बोरकर सर, आरु सर ,कु.डाखुरे मॅडम जाधव मॅडम यांनी सहकार्य केले.

# शालेय मिनी बचत बँक; आदर्श शिक्षक बबलू कराळे यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथील जिल्हा पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक बबलू विनायकराव कराळे यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम शालेय बचत बँक या बचत बँकेमध्ये एकूण 247 विद्यार्थी समाविष्ट असून खाते उघडलेले आहे. त्यांना प्रत्येकाचा पासबुक देण्यात आलेले असून आपली बचत बँकेमध्ये किती रक्कम जमा आहे ते त्यावरून कळते त्याचप्रमाणे



बँकेचे संपूर्ण व्यवहार विद्यार्थ्यांना कळावे याकरिता शालेय पिढी बचत बँक हा नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेमध्ये राबविल्या जात आहे. विद्यार्थी आपल्या पैशाचा उपयोग शैक्षणिक वस्तू खरेदी करण्याकरिता करतात. या मिनी बचत बँक मध्ये बँकेप्रमाणेच संपूर्ण व्यवहार केला जातो. बँकेचे संपूर्ण व्यवहार विद्यार्थ्यांना कळावे याकरिता शाळेमध्ये हा उपक्रम बबलू विनायकराव कराळे यांच्या मार्गदर्शनामध्ये हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविल्या जात आहे. या उपक्रमाचे पालक वर्गामधून स्वागत करण्यात आले आहे.

# पी.एम.किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी निधीचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, 2019 पासून सुरु केली आहे. सदरचा समारंभ केंद्र शासनाचा कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांनी एकत्रित राबविण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती सोयगाव कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी बोलताना सांगितले आहे. केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या 16 व्या हप्त्याचा लाभ वितरणावेळी रक्कम रू. 1943.46 कोटीचा लाभ राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ई-केवायसी पूर्ण केलेल्या एकुण 87.96 लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. महाराष्ट्र राज्यात सन 2023-24 पासून पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या पात्र शेतकरी कुटुंबांना राज्याच्या या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने पी. एम. किसान योजनेच्या 14 व्या हप्त्याचा लाभ अदा झालेल्या राज्यातील 85.60 लाख शेतकरी कुटुंबाना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता रक्कम रू. 1712 कोटी यापूर्वी अदा केला आहे. महाराष्ट्र शासन सन 2023-24 मधील उर्वरीत दुसरा व तिसरा हप्ता एकत्रितरित्या दिनांक 28 फेब्रुवारी, 2024 रोजी मौ. भारी, यवतमाळ येथिल समारंभात पंतप्रधानांच्या हस्ते वितरीत करणार आहे.

# मनमोहन काबरा सीएमए परीक्षेत उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** माहे डिसेंबर २०२३ मध्ये द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्यातर्फे "कॉस्ट अकाउंटिंग मॅनेजमेंट" (सी एम ए ) परीक्षा घेण्यात आली होती यात भारतातून एकूण ११,५०० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी फक्त ११७५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन त्याचा निकाल काल नुकताच जाहीर झाला. सोनवद या ग्रामीण भागातून मनमोहन प्रदीप काबरा या विद्यार्थ्याने अतिशय मेहनतीने, जिद्दीने अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून अभ्यास करून ऑल इंडिया रँक (AIR) ४७ वा नंबर गाठून यशस्वीरित्या उत्तीर्ण झाला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र सोनवद गावात तथा माहेश्वरी समाजात कौतुक होत आहे. मनमोहनला धीरज बेहेडे यांचे मार्गदर्शन तर जळगाव जिल्हा माहेश्वरी ज्येष्ठ नागरिक संघाचे संजय काबरा (काका), जामनेर येथील इंदिराबाई ललवाणी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. सुमित काबरा (भाऊ ) यांचे अनमोल सहकार्य लाभले.

# मोलखेडा जि. प. शाळेत मराठी भाषा गौरव दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील जिल्हा परिषद शाळेत"मराठी भाषा गौरव दिन"मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या शाळेत प्रमुख अतिथी कवीवर्य दिपक वारंगणे सर होते.त्यांनी मराठी भाषेला विसरु नका असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले कोणत्याही विचार प्रथम मातृभाषेतून आपल्याला सुचतो अशी माहिती दिली शाळेतील इ.१ ली ते ७ विद्यार्थ्यांनी तालासुरात काव्यवाचन केले.अशा प्रकारे जि प शाळेत या जागतिक मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहाने साजारा करण्यात आला. मराठी भाषेचा विकास आणि प्रसारास चालना मिळावी या दृष्टिकोनातून केंद्र प्रमुख शिक्षिका एस बी राठोड मॅडम यांच्या संकल्पनेतून यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम मराठमोळ्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी मराठी शब्दकोशांचे पूजन केले. भाषासमृद्धीची प्रातिज्ञा घेण्यात आली. मुख्याध्यापक अवधूत सर,आनंदा वारंगणे, संदीप कळसकर,बाजुळंगे सर, चौधरी सर या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. यानंतर ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांना आजच्या पूर्वनियोजित स्पर्धेच्या सूचना देण्यात आल्या होत्या, त्यानुसार म्हणी, समानार्थी विरुद्धार्थी शब्द, वाक् प्रचार यावर आधारित स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना प्रेरणा मिळावी व वाचनाचे महत्त्व जाणून घ्यावे या हेतूने मराठी राजभाषा दिन साजरा व्हावा या हेतूने जि प शाळेत या दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्राथमिकच्या ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनचे आयोजन करण्यात आले होते. निरनिराळ्या विषयावरील विविध पुस्तके या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. शाळेतील विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. या कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापक अवधूत सर यांनी आयोजन केले होते. तर सूत्रसंचालन संदीप कळसकर यांनी केले.यावेळी विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन केले. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा समन्वय समिती सदस्य, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिपाइंकडून ईव्हीएमच्या विरोधात निवेदन

## ईव्हीएम हटाव देश बचाओ लोकतंत्र बचावचा नारा

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देशात ईव्हीएमच्या विरोधात अनेक संघटना व विविध पक्ष भूमिका मांडत आहेत. ईव्हीएम हटावचा नारा दिला जात आहे.यासाठी अनेक ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपात आंदोलने केली जात आहेत. भूमिका मांडत निवेदन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतू या कडे शासन,प्रशासन आणि निवडणूक आयोग सुद्धा दुर्लक्ष करत आहे. ईव्हीएमला विरोध रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाच्या वतीने सुद्धा भूमिका मांडण्यात आलेली आहे. ईव्हीएम हटाव,देश बचाओ, लोकतंत्र बचाव चा नारा दिला जात आहे. रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार खंडाळा तालुका रिपाइं (आंबेडकर) यांच्या वतीने ईव्हीएम च्या विरोधात खंडाळा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आलेले आहे.हे निवेदन देते वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)चे खंडाळा तालुकाध्यक्ष पवन धायगुडे पाटील, महिला आघाडी खंडाळा तालुकाध्यक्षा सविताताई सपकाळ, खंडाळा तालुका सल्लागार अनिल केदारी, सुशांत भोसले व कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,आहे. रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार संपूर्ण भारत देशात व महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्हयामध्ये ईव्हीएम हटाव, देश बचाओ, लोकतंत्र बचाव याबाबत आंदोलने करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने सातारा जिल्ह्याचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे ईव्हीएम मशीनचे प्रातीकात्मक पत्रकाचे दहन आंदोलन करण्यात येणार आहे.भारत देशातील मोठ-मोठे आयटी सेंटर मधील एक्सपर्ट तज्ञ वैज्ञानिक तसेच माननीय सुप्रीम कोर्ट वकील,न्यायाधीश याबाबत आंदोलन करून सहभाग नोंदवत आहेत. ईव्हीएम मशीन मध्ये गडबड (हॅक) करता येऊ शकते. हे संपूर्ण देशवासीयांच्या लक्षात आल्याने ईव्हीएम मशीनच्या विरोधात जनमानसांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्याच बरोबर जगभरातील अमेरिका, चीन, जपान, इंग्लड, फ्रान्स अशा अनेक प्रगत देशांनी ईव्हीएम इलेक्ट्रोनिक मशीनचा मतदानासाठी करण्यात येणारा वापर बंद केला आहे. त्याचप्रमाणे आपल्या भारत देशामध्ये यापुढे मतदानासाठी ईव्हीएम मशीनचा वापर बंद व्हावा व बॅलेट पेपरवर सर्व निवडणुका घेण्यात याव्यात.

# विद्यार्थ्यांचा धर्मांतराचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण शिवारात असलेल्या संत जनार्दन स्वामी हॉस्पिटल व होमिओपॅथी महाविद्यालयातील प्राचार्य सावनी समीर यारनाळकर (वय-४४) त्यांचा सहकारी अस्लम झाकीर नदाफ (वय-२९) दोघे रा.जयसिंपुर ता.शिरोळ जि.कोल्हापूर आदींनी महाविद्यालयाच्या ओसरीत हिंदू विद्यार्थ्यांना नमाज पठण करण्यास सांगून हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या प्रकरणी फिर्यादी संस्थाचालक चांगदेव नारायण कातकडे (वय-६१) रा.कोपरगाव बेट यांनी गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

नमाज अदा करणे हा गुन्हा नाही;पण तुमच्या घराच्या चार भिंतींच्या आत किंवा तुमच्या मशिदीच्या चार भिंतींच्या आत किंवा परवानगी मिळालेल्या नियुक्त मोकळ्या जागेत नमाज अदा करणे उत्तम आहे.प्रार्थनेचा मूलभूत निकष म्हणजे तुमच्या देवतेवर केंद्रित असलेली एकाग्रता, ज्यासाठी शांत, स्वच्छ आणि शांत जागेची शिफारस केली जाते.रस्ते व उद्याने, महाविद्यालये हि काही नमाज अदा करण्याची ठिकाणे नाही. मशिदीत नमाज विरोधात काहीही नाही. गजबजलेल्या रस्त्यावर जड वाहतूक रोखून किंवा महाविद्यालयात जर हिंदू विद्यार्थ्यांना जर नमाज अदा करण्यास भाग पाडले जात असेल तर ती केवळ बेकायदेशीरच नाही तर अनैतिकही आहे.संपूर्ण समाजाला त्रास देणे हि कृती नक्कीच निषेधार्ह मानली पाहिजे.वर्तमानात काही असामाजिक तत्व यास हरताळ फासताना दिसत आहे हे कधी रेल्वेत तर कधी रस्ता बंद करून या अनैतिक कृती करून सामान्य जनमाणसास चिथावणी देण्याचे कृत्य करत असल्याचे या देशात वारंवार दिसून येत आहे.दरम्यान यात जर एखाद्या महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्राध्यापक असतील तर ? हा विषय आणखी गंभिर मानला पाहिजे.आणि त्यातही मुस्लिम प्राध्यापकांने जर हिंदू विद्यार्थ्यास महाविद्यालयातच जर नमाज पठण करण्यास लावले तर ते निश्चितच निषेधार्ह माणून त्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.अशीच घटना नूकतीच कोपरगाव बेटानजीक पूर्वेस कोकमठाण ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या राष्ट्रसंत जनार्दन स्वामी हॉस्पिटल आणि होमिओपॅथी महाविद्यालयात घडली असल्याने कहर उडाला आहे.मात्र हि घटना तब्बल दीड वर्षांपूर्वी घडली होती.मात्र ती आता उघड झाली असून त्यामुळे हा गुन्हा दाखल व्हायला एवढा उशीर का झाला ? असा प्रश्न सामान्य नागरिक महाविद्यालय आणि त्यांच्या प्रशासनास विचारीत आहेत.याचा तातडीने हिंदू संघटनांनी रात्री दहा वाजेच्या सुमारास कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात जाऊन निषेध केला असून कारवाईची मागणी केली आहे.त्यांनतर संस्थाचालक यांनी गुन्हा दाखल करण्याची तयारी दाखवली असल्याची माहिती हाती आली आहे.दरम्यान या प्रकरणी संस्था चालक यांचेशी भ्रमणध्वनिवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो यशस्वी झाला नाही.

दरम्यान घटनास्थळी तातडीने शिर्डीचे पोलीस उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक विश्वास पावरा,उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे आदींनी भेट दिली आहे. या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात फिर्यादी संस्थाचालक चांगदेव कातकडे यांनी नुकताच गुन्हा क्रं.९०/२०२४ भा.द.वि.कलम २९५,३४ प्रमाणे वरील दोन आरोपी विरुद्ध दाखल केला आहे.

# निंबार्क इंग्लिश स्कूल अँड जुनियर कॉलेज पैठण येथे विज्ञान दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** निंम्बार्क इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज तर्फे आयोजित विज्ञान प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. बुधवार २८ फेब्रुवारी रोजी पैठण शहरातील भवानीनगरातील राजे संभाजी अभ्यासिका केंद्रामध्ये इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेजचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. सखु झारगड यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून, पत्रकार सुरेश वायभट, पत्रकार दादा घोडके, पत्रकार शिवाजी गाडे, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण मोरे, मुख्याध्यापक त्रिंबक बटुळे, साधना मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 28 फेब्रुवारी 1928 रोजी भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर सीव्ही रमण यांनी रमन प्रभावाचा शोध लावल्याबद्दल दरवर्षी 28 फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन भारतात साजरा केला जातो .व दरवर्षी प्रमाणे या वर्षी हि निंबार्क इंग्लिश स्कूल अँड जुनियर कॉलेज पैठण येथे विज्ञानदिन साजरा करण्यात आला, निंबार्क स्कूल च्या विद्यार्थ्यांनी खूप छान विज्ञानावरती आधारित प्रोजेक्ट तयार केले होते, व स्कूल मधील खूप मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते या विज्ञान प्रदर्शनात निंम्बार्क इंग्लिश स्कूलच्या अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन आपल्या कला गुणांना चालना दिलेली दिसून आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण मोरे, मुख्याध्यापक त्रिंबक बटुळे, साधना मोरे, पालक माणिक थोरात, शाळेचे शिक्षक साधना मोरे, कृष्ण जाधव, रामनाथ जावरे, दत्तू चेडे , प्रतिभा तेलोरे , मीरा जाधव, काकडे मॅडम, पूजा औटे, शाहीन मॅडम, ज्योती गीते, नितीन मोरे यांनी परिश्रम घेतले.



# वादळी वाऱ्यासह अवकाळी, रब्बीला फटका

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी सह परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने रब्बी पिक हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. दि.२७ रोजी अचानकपणे वादळीवाऱ्यासह दुपारी पाऊस झाल्याने रब्बी पिक हंगामातील गहू हरभरा मका कांदा ज्वारी बाजरी कांदा पिकांचे तरी विट भट्टी, आंबे बार पिकांचे मोठे नुकसान झाल्यानें शेतकऱ्यांत चिंता वाढली आहे.हाती तोंडासी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाल्यानें शेतकरी हवालदिल झाला आहे.तालुक्यात काही ठिकाणी पिकें आडवे झाले आहे.तर झाडे ,झाडाच्या फांद्यां खाली पडल्या आहेत.तर विट भट्टीधारक निसर्गाच्या लहरीपणामुळे पुरता वैतागला आहे.अचानकपणे आलेल्या अवकाळीने नागरिक शेतकरी चिंतीत झाला आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला रुग्णालयाचा आढावा; रुग्णांची आस्थेने विचारपूस

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील नागरिकांना वेळेवर उपचार व स्थानिक स्तरावरच उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना व त्याची अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.27) बल्लारपूर व राजुरा तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयास भेट देत रुग्णालयातील उपलब्ध आरोग्य सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी (बल्लारपूर) स्नेहल रहाटे, रवींद्र माने (रविंद्र माने), जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कळसकर बल्लारपूरचे तहसीलदार ओमकार ठाकरे, राजुराचे तहसीलदार ओमप्रकाश गौंड आदी उपस्थित होते.

बल्लारपूर व राजुरा उपजिल्हा रुग्णालयातील अपघातग्रस्त व उपचार घेत असलेल्या रुग्णांशी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आस्थेने विचारपूस करून संवाद साधला. जेवण वेळेवर मिळते का ? कधी भरती झाले ? कोणता आजार आहे ? असे प्रश्न विचारून लवकर बरे व्हा, असा आशावाद व्यक्त केला. रुग्णांनीसुध्दा जिल्हाधिकारी विन गौडा यांच्या प्रश्नांना सकारात्मक उत्तरे दिली. यावेळी त्यांनी बल्लारपूर व राजुरा उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स व इंटर्न डॉक्टरांची उपलब्धता, मनुष्यबळ, औषधांचा साठा, उपलब्ध खाटा, डॉक्टरांसाठी निवासव्यवस्था तसेच रुग्णालयाकडून देण्यात येणा-या आरोग्यविषयक सुविधांची माहिती जाणून घेतली. विविध विभागांची पाहणी : जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी बल्लारपूर आणि राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयातील बाह्यरुग्ण, आंतररुग्ण विभाग, क्ष-किरण विभाग, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, संसर्गजन्य रोग नियंत्रण कक्ष, रुग्ण तपासणी कक्ष, आयुष विभाग, अपघात विभाग स्त्री व पुरुष रुग्ण विभाग, बाल उपचार केंद्र, हिरकणी कक्ष, अलगीकरण कक्ष आदी विभागास भेट देत आरोग्य व्यवस्था व सुविधांची पाहणी केली.



# संत साहित्याने मराठी भाषा समृद्ध केली : विलास लांडे

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आपली मातृभाषा आपण जपली पाहिजे. आपल्या भाषेवर प्रेम केले पाहिजे. आज तंत्रज्ञानाचं युग आहे. या विज्ञानवादी युगात आपल्या मराठी भाषेचे महत्व कायम आहे. त्याचं कारण म्हणजे आपले संत साहित्य होय. संत साहित्याने मराठी भाषा समृद्ध केली आहे, असे प्रतिपादन राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विलास लांडे यांनी केले.ते राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या "मराठी भाषा गौरव दिन" या कार्यक्रमातून



मराठी भाषेचे महत्व विशद करताना बोलत होते. वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून ग्रंथ पूजन आणि मराठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.या वेळी संस्थेचे अध्यक्ष विलास लांडे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा या ज्ञानग्रंथांचे पूजन करण्यात आले. हा अनोखा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न करण्यात आला. मराठी मध्ये सही करून मराठी भाषेचा संवर्धन करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत असताना यांमध्ये विद्यार्थ्यांसह अनेक मान्यवर पदाधिकारी,प्राध्यापकांनी सर्वांनी सहभाग घेतला.उपप्राचार्य किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, प्रबंधक अश्विनी भोसले, डॉ.धनंजय बागुल यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक यांमध्ये सहभाग नोंदवत मराठीत सही केली. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा.सविता साबळे व मराठी विभाग प्रमुख प्रा.सुमित उबाळे यांनी केले होते.



# आरोग्य व्यवस्थापनावर कडक कारवाई करण्याची वंचित बहुजन आघाडीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शासकीय उपजिल्हा रुग्णालयात विविध आरोग्य सुविधांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही.सुविधा उपलब्ध असताना रुग्णांना सुविधेपासून ताटकळत ठेवण्याची कृती करणा-या आरोग्य व्यवस्थापनावर कडक कारवाई करुन सर्व सामान्य रुग्णांसाठी आरोग्य सुविधा प्रभावीपणे सुरु करावी या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे शहर शाखेतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपजिल्हा रुग्णालय समोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष जाकीर पठाण यांच्या नेतृत्वाखाली तालुका उपाध्यक्ष सखाराम शिनगारे, शहर संघटक फय्याज सौदागर, शहर सचिव फय्याज सय्यद, किरण पवार आदी कार्यकर्त्यांनी शंभर खाटाचे उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल महिलांवर दोन स्त्रीरोग तज्ञ असताना सिझर केले जात नाही.अतिगंभीर रुग्णावर उपचारासाठी सर्व सुविधा असताना त्यांच्या केवळ प्राथमिक उपचार करुन दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचा सल्ला दिला जातो.

दंत विभागातील वैद्यकीय अधिकारी महिनोमहिने रुग्णालयात येत नसल्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्याचा जावे लागते.साडे तीन कोटी खर्च करुन उभारलेल्या अतिदक्षता विभागात जनरल फिजिशियन तज्ञ नसल्यामुळे हा कक्ष शोभेची वस्तु झाला आहे. रुग्णालयात तब्बल १७ वैद्यकीय अधिकारी व मोठ्या संख्येने कर्मचारी कार्यरत आहेत मात्र याठिकाणी कोणतीही रुग्ण सेवेची अंमलबजावणी होत नसल्याची सदैव ओरड असते जिल्हा शल्यचिकित्सकांनी येथील व्यवस्थापनाला पाठीशी घातल्यामुळे सरकारी रुग्ण सेवेचा येथे हाहाकार उडाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष जाकीर पठाण यांनी केला.

# भागवत कराड यांच्याहस्ते मौजे नादरपूर फाटा ते भिलदरी फाटा रस्त्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** नादरपूर, ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय संत श्री गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त मा. ना भागवतजी कराड केंद्रीय अर्थ राज्य मंत्री भारत सरकार यांचे हस्ते मौजे नादरपूर फाटा ते भिलदरी फाटा रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले व मा.ना. श्री भागवतजी कराड ,मा.आ.श्रीयुत उदयसिंग राजपूत व इतर मान्यवर यांच्या हस्ते श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले याप्रसंगी मा.कराड केंद्रीय अर्थ राज्य मंत्री,मा.श्री उदयसिंग राजपूत आमदार कन्नड-सोयगाव मतदार संघ,भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खम्बायते ,डॉ.संजय गव्हाणे भाजपा निवडणूक प्रमुख,श्री किशोर आबा पवार तालुकाध्यक्ष भाजपा,श्री गणेश घुगे प्रदेश कार्यकारिणी सदस्य, श्री प्रदीप पा.बोडखे तालुका सरचिटणीस,श्री पप्पू दवंगे तालुकाउपाध्यक्ष भाजपा ,श्री भरतसिंग राजपूत शिवसेना जिल्हाप्रमुख,श्री कडवकर साहेब तहसीलदार कन्नड, चंद्रहार ढोकने साहेब गट विकास अधिकारी पं.स.कन्नड, सुग्रीव केंद्रे साहेब कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, प्रशांत येरणे, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम, पठाण शाखा अभियंता सा.बां.विभाग कन्नड, सुरेश बनसोड कॉन्ट्रॅक्टर, सुभाष पा.निकम जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी व परिसरातील पदाधिकारी इ मान्यवर उपस्थित होते.मा.कराड यांनी प्रथम सरपंच,गटविकास अधिकारी साहेब व तहसीलदार यांचे उत्कृष्ट कामे केल्याबद्दल अभिनंदन केले.श्रीयुत कडवकर तहसीलदार व गटविकास अधिकारी यांचा सत्कार केला. मा.कराड यांनी ग्रामस्थ नादरपूर,परीसरातील नागरिक तसेच महिला बचत गट,कलावंत मंडळी यांना संबोधी करताना प्रत्येक महिला बचत गटास रु.30000/- देण्याचे आश्वासन दिले. जि.प.प्राथमिक शाळेसाठी 10 संगणक देण्याची घोषणा केली.

गावातील व परिसरातील कलाकार तसेच अंगणवाडी कर्मचारी यांचे निवेदन स्विकारून त्यांच्या मागण्या संदर्भात तोडगा काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. नादरपूर गावातील एकजूट पाहून त्यांनी सर्व ग्रामस्थांचे कौतुक केले तसेच नादरपूर गाव हे राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी मदत करणार असल्याचे जाहीर केले. यावेळी ग्राम पंचायत कार्यकारी मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, ग्राम पंचायत कर्मचारी, ग्रामस्थ यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीयुत दिलीप निकम यांनी केले व सूत्र संचालन श्री लक्ष्मण बळी यांनी केले. श्रीयुत सुभाष पा.निकम यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# जनतेने लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा सुविधांचा लाभ घ्यावा : न्यायाधीश कोळसे

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** जनतेने महाराष्ट्र शासनाच्या लोकसेवा हक्क अधिनियम 2015 च्या अंतर्गत मिळणाऱ्या सेवा व सुविधांचा फायदा घ्यावा, असे कन्नड न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पी.एम .कोळसे यांनी कन्नड पंचायत समितीचे सभागृहात दिनांक 23. रोजी घेण्यात आलेल्या कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर प्रसंगी प्रतिपादन केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. ते पुढे असे म्हणाले की... सदर अधिनियम हा सर्व स्थानिक, सार्वजनिक व शासकीय विभाग तसेच प्राधिकरण यांनाच लागू असून खाजगी संस्थांना लागू नसेल, तसेच या कायद्याचा उद्देश हा महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अंतर्गत सर्व सार्वजनिक प्राधिकरणामार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित काल मर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 पारित करण्यात आला असून तो दिनांक 28. 0 4. 2015 पासून अंमलात आणण्यात आलेला आहे. सामान्य नागरिकांना सहज, सुलभ व मर्यादित वेळेत सेवा प्राप्त व्हावी, हे या कायद्याचे उद्दिष्ट असून जर पात्र नागरिकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा योग्य कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय तसेच तृतीय अपील आयोगाकडे दाखल करता येते. त्यामुळे कसूरदार अधिकाऱ्यास प्राधिकरण रुपये 5000 /-पर्यंत दंड सुद्धा आकारू शकते. सदर कायद्याअंतर्गत गृह खाते, परिवहन खाते, महसूल व वन विभाग, शेती विभाग, नगर विकास, विधी व न्याय, ग्रामीण विकास, महिला व बालकल्याण विकास अशा विविध विभागाअंतर्गत सुमारे 597 प्रकारच्या सेवा व सुविधा प्राप्त होतात... अशा प्रकारची सविस्तर माहिती दिली. यावेळी कन्नड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी अन्नसुरक्षा कायदा तसेच अन्न व शिक्षणाचा अधिकार तसेच उपाध्यक्ष ॲड. अनंत शेजवळ यांनी मोटार अपघात कायद्याची तर ॲड. भगवान चव्हाण यांनी जेष्ठ नागरिकांच्या उदरनिर्वाह व त्यासंबंधीच्या उपाययोजनांची तसेच पंचायत समितीचे अधीक्षक श्री एच. एस.कोलमवार यांनी माहितीचा अधिकार 2005 या कायद्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एच. एस.कोलमवार यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत ढोकणे यांनी केले तर आभार प्रदर्शन वकील संघाचे सचिव ॲड. निलेश थोरात यांनी केले. .वेळी तालुका विधी सेवा समिती व प्राधिकरणाच्या श्रीमती एस. जी. चव्हाण मॅडम उपस्थित होत्या.

# वादविवाद स्पर्धेत प्रेम जरपोतवार प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**वरोरा :** आनंद निकेतन महाविद्यालयात स्व. इंदिराबाई जनार्दनपंत देशपांडे स्मृती आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा २३ फेब्रुवारी रोजी पार पडली. भारतातील वाढते खाजगीकरण देशाच्या हिताचे ठरेल काय? होय / नाही हा या स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धेत स्व. सुशीलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालयाचा प्रेम जरपोतवार याने प्रथम क्रमांक प्राप्त केला.आनंद निकेतन महाविद्यालयाचा मयूर हणवते याने द्वितीय, तर सरदार पटेल महाविद्यालयातील प्रलय मशाखेत्री याने तिसरा क्रमांक प्राप्त केला.उत्तेजनार्थ पारितोषिक श्रुती मोहितकर, सुरज चापले यांना देण्यात आले. फिरता चषक सुशीलाबाई रामचंद्रराव मामीडवार समाजकार्य महाविद्यालयास मिळाला. सर्व विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देत मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मृणाल काळे हे होते. परीक्षक म्हणून प्रा. डॉ.दिलीप चौधरी, डॉ.रवींद्र शेंडे, डॉ. श्रीकांत साव यांनी काम पाहिले.तिन्ही परीक्षकांनी आपले विचार याप्रसंगी व्यक्त केले. विषयाचे आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मांडलेल्या मतांचे कौतुक केले. वादविवाद स्पर्धेत प्रथम पारितोषिक आणि फिरता चषक मिळविल्याबद्दल सुशीलाबाई रामचंद्रराव मामीडवार समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री कापसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ ममता ठाकुरवार, प्रा. संतोष आडे तसेच प्राध्यापक वृंदांनी प्रेम जरपोतवार व सुरज चापले यांचे अभिनंदन केले आहे.



# बसवराज पाटील, रश्मी बागल यांचा भाजपात प्रवेश

## उपमुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** माजी राज्यमंत्री आणि प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष बसवराज पाटील, सोलापूर जिल्ह्यातील रश्मी बागल,मकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष दिग्विजय बागल यांच्यासह राज्यातील विविध पक्षांतील असंख्य नेते व कार्यकर्त्यांनी मंगळवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या सर्वांचे स्वागत केले. बसवराज पाटील, रश्मी बागल यांसारख्या नेत्यांमुळे भारतीय जनता पार्टी आणखी मजबूत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा, खा.सुधाकर शृंगारे,खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, आ. राणा जगजितसिंह पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भाजपा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारत घडविण्याच्या संकल्पात हातभार लावण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टीत अनेक जण प्रवेश करीत आहेत. विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याच्या इच्छेनेच बसवराज पाटील यांच्यासारखं जुनं, जाणतं आणि सुसंस्कृत नेतृत्व भारतीय जनता पार्टीत सहभागी झालं आहे. बसवराज पाटील, रश्मी बागल यांच्यासारखे नेते कोणत्याही अपेक्षेने पक्षात आलेले नाहीत. त्यांच्याकडून समाजहिताच्या ज्या मागण्या मांडल्या जातील त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे पक्षवाढीसाठी घेत असलेल्या परिश्रमांचे विशेष कौतुक केले.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यावेळी म्हणाले की, अनेक वर्षे काँग्रेसचे काम निष्ठेने केलेल्या बसवराज पाटील यांच्यासारख्या नेत्यालाही देशाचा विकास नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वच करू शकेल याची खात्री वाटत आहे. "मोदी की गॅरंटी" वर विश्वास ठेवूनच समाजातील विविध घटकांतील नेते कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करत आहेत.

आपण ४० वर्षे प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काँग्रेस पक्षासाठी काम केले. त्याच निष्ठेने आपण भारतीय जनता पार्टीसाठी काम करू, असे मनोगत बसवराज पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्प पत्रासाठी सामान्य जनतेकडून सूचना मागविण्याच्या अभियानाचा प्रारंभ प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

"उबाठा" मधून भाजपामध्ये आलेल्या राम गावडे यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर लिहिलेल्या जननायक या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले.



# आदिवासींना योजनांचा लाभ मिळावा यासाठी आनंद लोंढे यांचे आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सन 2024-25 साठी धुळे शहरातील शबरी आदिवासी घरकुल योजना लाभार्थ्यांसाठी धुळे महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागविण्याबाबत महानगरपालिका आयुक्त यांच्या माध्यमातून पत्र पाठवणे यासाठी आनंद लोंढे यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. शबरी आदिवासी घरकुलाचा आदिवासी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना त्यांचा लाभ मिळावा म्हणून अनेक लाभार्थी आनंद लोंढे यांच्या पक्ष कार्यालयात येवुन घरकुलाचा लाभ मिळावा म्हणून त्यांच्या पक्षाच्यावतीने मदत करावी यासाठी आमच्या माध्यमातून देण्यात येत आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले.

ह्या निवेदनाच्या ठिकाणी सांगण्यात आले की, मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धुळे यांच्याकडे या संदर्भात बैठक झाली. सदरचे महानगरपालिकेकडे गरजु अर्जदारांचे अर्ज महानगरपालिका प्रशासनाने प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात जमा करावे. परंतु या बाबतीत कुठलेही आदेश प्रकल्प अधिकारी धुळे यांच्या मार्फत महानगरपालिका धुळे यांना प्राप्त झाले नाहीत, असे आपल्या प्रशासनाचे म्हणणे होते. त्या अनुषंगाने काल दि. 22 रोजी म.प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धुळे जि.धुळे यांना पत्रव्यवहार केला असता त्यांनी आपल्या कार्यालयाकडे दि. 20 रोजी या संदर्भातील अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून पत्र पाठविले आहे. सदर पत्राची प्रत त्यांनी आम्हाला दिली आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले. त्यामुळे आपण धुळे महानगरपालिकेमार्फत सदर योजनेसाठी स्वच्छ व नियमानुसार वर्तणुक करणारा अधिकारी नेमणुक करण्यात यावा. जेणेकरुन सदर योजनेशी निगडीत पत्रव्यवहार करतांना गरजू आदिवासी बांधवांना मानसिक त्रास होणार नाही. तसेच त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची आर्थिक मागणी होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी ही विनंती करण्यात आली. सदर योजना आपण तात्काळ राबवावी, कारण लवकर गरजु लाभार्थ्यांना त्याचा लाभ घेता येईल. जवळच लोकसभेची निवडणूक आलेली आहे, म्हणून अधिकारी व कर्मचारी वर्ग त्या कामात व्यस्त होतील व या अनुसूचित जमातींच्या लोकांसाठी असलेल्या योजना राबविण्याकामी दिरंगाई होऊ शकते. आधीच वर्षानुवर्षे बेघर असलेले आदिवासी बांधव शासन योजनांच्या लाभासाठी आपल्या कार्यालयाच्या चकरा मारुन मारुन दमलेले असतात. पुन्हा आपल्या कार्यालयाशी संबंधीत काही एजंट अशा योजनांचा फायदा घेऊन संबंधीत अर्जदारांकडून आर्थिक देवाण-घेवाण करुन आपल्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अर्जदारांची पिळवणूक करीत असतात. म्हणून अर्जाची छाननी करीत असतांना कुठल्याही एजंटांकडून सदर अर्ज स्विकारु नये. कुठल्याही अर्जदारावर अन्याय होणार नाही याची पुर्ण काळजी घ्यावी. तसेच सदर अर्जाबाबत दोन दिवसाच्या आत तक्रारदारांना तात्काळ लेखी खुलासा द्यावा. आपण तात्काळ या संदर्भातील जाहिरात व तसे सुचनाफलक जाहीर करण्यात यावेत असेही सांगण्यात आले.

# मराठी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे

## प्रा. शैला क्षीरसागर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राज्यसेवा, पीएसआय, एसटीआय, असिस्टंट, सरळ सेवा, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक यांसारख्या शासकीय सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या परीक्षेमध्ये मराठी विषयाला स्थान मोठे आहे. याची जाणीव विद्यार्थी दशेतील विद्यार्थ्यांना नाही ही गोष्ट दुर्दैवाची आहे.शब्दही मोठे भांडवल आहे. त्याचा वापर करून जीवन यशस्वी करता येते.प्रवचन व कीर्तन या कलांमध्ये सामाजिक व अध्यात्मिक ज्ञानाबरोबर मराठी भाषेचे ज्ञान असणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन मुधोजी महाविद्यालय फलटण येथील प्रा. शैला क्षीरसागर यांनी केले.त्या लोणंद ता.खंडाळा येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमातून बोलत होत्या.मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या सामंजस्य करार अंतर्गत आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ' मराठी साहित्य आणि मराठी विषयातील संधी ' या विषयावर संवाद साधण्यासाठी मुख पाहुण्या म्हणून प्रा.शैला क्षीरसागर यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रा. शैला क्षीरसागर म्हणाल्या की,मातृभाषेतून घेतलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांना लवकर आकलन होत असते.त्यामुळे मातृभाषा येणे ही काळाची गरज आहे.त्याचबरोबर प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे.

शब्दात मोठी ताकद असते ती समजून घेणे गरजेचे आहे.मराठी विषयांमध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत.आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमामध्ये तसेच दूरदर्शन वरती अनेक मालिका सुरू आहेत. त्यामध्ये संवाद लेखन, पटकथा लेखन, गीत लेखन,कथालेखन,संवाद लेखन,अनुवाद,प्रकाशन,ब्लॉग लेखन,वेब सिरीज संवाद,बातमी लेखन,निवेदक,सूत्रसंचालक, परिसंवाद लेखन या क्षेत्रामध्ये मोठी संधी आहे, असे सुद्धा त्यांनी सांगितले. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला मान्यवरांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या विशेष व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कला विभागाचे उपप्राचार्य प्रा.भिमराव काकडे होते. मराठी विभाग प्रमुख प्रा सुभाष कदम,डॉ.कोकिळा चांगण, प्रा.सतीश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा.सुभाष कदम यांनी करून दिला. महाविद्यालयातील प्रा. जालिंदर वाघ,प्रा.छाया सकटे,प्रा. लोखंडे आदीं सह विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कोकिळा चांगण यांनी केले व प्रा. सतीश कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले.



# शेलगाव (खुर्द) येथे भाजपा कामगार मोर्चातर्फे असंघटित कामगारांना भांडी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** भाजपा कामगार मोर्चातर्फे असंघटित कामगारांना संसार भांडी वाटप करण्यात आली यावेळी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रदीप पाटील, आबा भाजपा कामगार मोर्चा तालुका अध्यक्ष दादाराव तुपे पाटील. सोसायटी व्हा चेअरमन जनार्दन तुपे पिरबावडा चे माजी सरपंच आजिनाथ मुळे, अनिल ईधाटे, भागिनाथ बोचरे, गजानन मंदाडे, विजय मंदाडे, शेलगाव खुर्द माजी सरपंच बाबुराव तुपे, देऊबा ईधाटे सोमनाथ ईधाटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध गावांतील 180 कामगार उपस्थित होते.



# लिला सपकाळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** थायलंड येथे पार पडलेल्या तिसऱ्या आंबेडकरी साहित्य परिषदेच्या कार्यक्रमात पुणे येथील आदर्श पदवीधर शिक्षिका पुरस्कार प्राप्त निवृत्त शिक्षिका लीला सपकाळे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

लीला सपकाळे यांना महाराष्ट्र शासनाचा आदर्श पदवीधर शिक्षिका पुरस्कार मिळालेला असून, सावित्रीबाई फुले पुरस्काराने सुध्दा त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे,वंश निळ्या आकाशाचा व मानवंदना हि दोन पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांचे सामाजिक कार्य भरीव असे आहे. आजरोजी लिला सपकाळे गरीब कुटुंबातील पाच मुले व पाच मुलींचा सांभाळ करीत असून यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च त्या स्वतः करीत आहे. विधवा व वृद्ध महिलांना सुद्धा त्या वेळोवेळी मदत करतात. कोरोना काळातही त्यांनी गोरगरीब जनतेसाठी कार्य केलेले आहे. महाराष्ट शासनाच्या अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सुद्धा त्यांना सम्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत थायलड येथे पार पडलेल्या तीसऱ्या आंबेडकरी साहित्य परिषदेमध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक श्रीपाल सबनीस, सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ.एन.सिह, डॉ.के. पी.वासनिक,दिपक कुमार यांच्या हस्ते त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केल्या जात आहे.

# वडोदबाजार पोलीसांची अशीही माणुसकी

## ७५ वर्षीय वृध्देस दिले नातेवाईकांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील आळंद गावांमध्ये गेल्या १५ दिवसापासून बेवारस निराधार अवस्थेत फिरणाऱ्या ७५ वर्षीय महिला ही गावात व बसस्टँड परिसरात दिवसरात्र प्रचंड थंडीत फिरत असल्याचे आढळून आली होती. मळालेले कपडे, हातात एक पिशवी, पायात चप्पल देखील नाही,पोटात अन्नाचा कण नाही त्यांच्याकडे पाहून आळंद गावातील सुज्ञ नागरिकांनी वडोदबाजार पोलीस ठाण्याचे इन्चार्ज व्ही.एस.मोरे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना माहिती दिली असता त्यांनी तात्काळ त्या वृध्द महिलेची शहानिशा करुन सु-लक्षी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून चालविले जाणारे माणुसकी वृध्दाश्रम जटवाडा रोड संभाजीनगर येथे पुनर्वसनासाठि दाखल केले होते.तीच्या नातेवाईकांचा शोधमोहीम पोलीसांनी व



माणुसकी समुहाच्या टीमने चालु केला असता ती वृद्ध महिला काहिहि एक बोलायला तयार नव्हती माणुसकी टिम ने वृद्ध सेवालय येथे तिची अन्न वस्त्र निवारा औषधोपचाराची पुर्ण काळजी घेतली व विविध वृत्तपत्रांत वृद्ध महिलेची पुनर्वसनासाठी माणुसकी वृद्ध सेवालय येथे दाखल केल्याची बातमी माणुसकी टिम व पोलीसांनी सोशल मीडिया वर पाठवली असता तीचे नातेवाईक सिल्लोड तालुक्यातील शिंदेफळ येथे राहत असल्याचे कळाले असता त्या वृद्ध महिलेच्या नातेवाईकांचा शोध लागला नातेवाईकांनी पेपरची बातमी पाहून तिचा मुलगा यादवराव गुंडाजी उनवने यांनी माणुसकी वृद्ध सेवालय संपर्क करुन ती आमची आई असल्याचे सांगितले व दि.२६-२-२४ रोजी सदर वृद्ध महिलेच्या नातेवाईकास समाजसेवक शुभेच्छांनी वडोद बाजार पोलीस स्टेशन येथे बोलावून पोलिसांना माहिती दिली व सदर वृद्ध महिलेस नातेवाईकांना समज देऊन ताब्यात दिले. या सामाजिक कार्यामध्ये सुनिल इंगळे साहेब साय्यक पोलीस निरीक्षक वडोदबाजार,संभाजी खाडे उप पोलीस निरीक्षक,संजय जिवरक, राहुल दामधर पोलीस नाईक, आळंद गावातील गावकरी सरपंच कैलास गायके, ऊपसरपंच रामेश्वर चोपडे, तंटामुक्ती अध्यक्ष कौतीक पायगव्हाण, ज्ञानेश्वर चोपडे, आजिनाथ गायके, संकेत पांडे, बबन तायडे,आजिनाथ चोपडे व माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित, समाजसेवीका पुजा पंडित, प्रा.शरद सोनवणे आदींनी मदत कार्य केले.

# लोणार तालुक्यात अवकाळीसह गारपीट!

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** निसर्गावर अवलंबून असलेल्या बळीराजावर संकटांची मालिका चालूच लोणार तालुक्यात गारपीट सह



मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात गहू, हरभरा, शाळु पिकांसह नेट शेडचे नुकसान हवामान केंद्राने दोन दिवसापूर्वी दिलेल्या इशाऱ्यानुसार काल रात्री साडेआठच्या सुमारास लोणार शहर व तालुक्यात विजाच्या कळकटासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे रब्बी पिकाचे नुकसान झाले. आर्धातास पडलेल्या पावसामुळे व लोणार शहरासह तालुक्यातील सरस्वती, किन्ही, तांबोळा, हत्ता, चिखला तसेच बिबी परिसरात गारपीट झाल्याने बहुतांश शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याने शेतकऱ्यांच्या गहू, हरभरा, कांदा, मक्का पिकांचे नुकसान झाले आहे. काढणीस आलेल्या गहू हरभरा चे नुकसान झाले दिलेल्या इशारा पुढील दोन दिवस अवकाळी पाऊस पडल्यास हाताशी आलेली पिक वाया जाण्याची शक्यता आहे.



# मराठी भाषा संवर्धनात संतांचे योगदान महत्त्वपूर्ण : डॉ. जगदीश पाटील

## सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा गौरव दिन

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** हजारो वर्षांची गौरवशाली परंपरा असलेल्या मराठी भाषेचा उपयोग करून त्यात मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्मिती करण्याचे काम संतांनी केले आहे. त्यामुळे आधीच सुंदर असलेल्या मराठी भाषेला समृद्ध करून तिचे संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान संतांनी दिले असल्याचे प्रतिपादन बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांनी येथे केले. भुसावळ येथील सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष हिंमत उर्फ मुन्ना ठाकूर, ग्रंथपाल नितीन तोडकर, म्युनिसिपल हायस्कूलचे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके, सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे, होनाजी चौधरी उपस्थित होते. प्रारंभी सरस्वती मातेच्या पुतळ्याला डॉ. जगदीश पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर मुख्याध्यापक ललितकुमार फिरके यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. जगदीश पाटील यांनी मराठी व शिक्षणशास्त्र विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा वाचनालयातर्फे अध्यक्ष हिंमत उर्फ मुन्ना ठाकूर यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी डॉ. जगदीश पाटील यांनी स्वलिखित श्री संत एकनाथांच्या अभंगातील भक्ती या ग्रंथासह सुमारे दीड हजार रुपये किमतीची पुस्तके वाचनालयाला सप्रेम भेट दिली. डॉ. जगदीश पाटील यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचे महत्व आणि भाषा संवर्धनात आपली जबाबदारी याबाबत माहिती देऊन मराठी भाषा संवर्धनात संतांनी दिलेले योगदान सांगितले. अध्यक्षीय मनोगत वाचनालयाचे अध्यक्ष हिंमत उर्फ मुन्ना ठाकूर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे यांनी तर आभार ग्रंथपाल नितीन तोडकर यांनी मानले. यावेळी वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. ग्रंथ प्रदर्शनात सुमारे दोनशेपेक्षा जास्त पुस्तके ठेवण्यात आली होती. त्याचा लाभ वाचकांनी घेतला.

# लोखंडी जाळी टाकुन रस्त्यांची उंचीचा रस्ता

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे लक्ष्मी मंदिर परिसरात सोनवणे वस्ती रस्ता उंच करण्यासाठीं लोखंडी जाळीचा वापर करून नदीतून रस्त्याची उंच करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

पावसाळ्यात सतत रस्ता पुर पाण्यामुळे रस्ता वाहून जातो व पावसाळ्यात रस्ता सतत पुरपाण्यात असतो तर दुसरीकडे शेतकरी पावटी रस्ता गाडी वाट शेतातून रस्ता देण्यास तयार नाही.त्यामुळे लक्ष्मीमंदिर परिसर कोल्हापूर बांध (केटीबांध) लगत लोखंडी तारी टाकून नवीन पॅटर्न गॅबरींग रस्ता काम हाती घेण्यात आले आहे.पुरपाण्यामुळे रस्ता वाहु नये या साठी जमीनीची खोदाई करुन त्यात लोखंडी तारी जाळी टाकत शेतबांधाकडे वत ठेवत जाळीचा गॅबरींग रस्ता काम हाती घेण्यात आले असुण त्यामुळे शेतवसस्तीवर ये जा साठी चा रस्ता करण्याचें काम होत असल्याने शेतवस्तीवरील ये जा करणाऱ्या शेतकऱ्यांची समस्या दुर होणार आहे.त्यामुळे शेतकरी तथा नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.






गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सत्ताधारी, विरोधकही कशामुळे गप्प : जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सत्ताधारी आणि विरोधक दोघेही



शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गप्प असल्याची प्रतिक्रिया शरद जोशी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी आधुनिक केसरी प्रतिनिधी सुधाकर जेठे यांना दिली विरोधक असो वा सत्ताधारी यांना काहीही करून फक्त सत्तेत यायचय. शेतमालाला भाव नाही, दुष्काळी मदत अद्यापही मिळाली नाही जो काही तोकडा पीकविमा शेतकऱ्यांना मिळाला तसेच उर्वरित शेतकऱ्यांना देखील त्यांच्या हक्काचा पीकविमा मिळवून दिल्या शिवाय शेतकरी संघटना गप्प बसणार नाही म्हणून शेतकऱ्यांनो तुम्ही लक्षात ठेवा राजकारणी फक्त निवडणुकीलाच पावतात. जातीपातीचे राजकारण न करता आपले प्रश्न मांडणारा लोकप्रतिनिधी विधानभवनात पाठवा जेणे करून शेतकऱ्याच्या प्रश्नाना वाचा फुटेल. म्हणून आता आपण कर्जमुक्तीसाठी सरकारवर दबाव वाढवला पाहिजे, यानिमित्ताने किमान तेवढे तरी शेतकऱ्यांच्या पदरात पडेल.

सरकारनेही जसे मोठ्या उद्योगपतींचे कर्ज माफ केले तसेच शेतकऱ्यांचेही सरसकट कर्ज माफ करावे असे आव्हान शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी केले. सरकारने महागाई नियंत्रित ठेवण्याच्या नावाखाली कापसाचे व सोयाबीनचे भाव पाडले, त्यामुळं इच्छा असूनही शेतकरी कर्ज भरू शकत नाही. त्यामुळे सरकारने कर्ज माफी करावी. अन्यथा शेतकरी मतदान करतांना याचा नक्की विचार करतील असा इशाराही त्यांनी दिला.

# कर्जत शहरात भक्तीभावाने श्री संतशिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सुभाष माळवे**

**कर्जत :** सोनार समाजाचे औराध्य दैवत श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ७३८ वी पुण्यतिथी कर्जत येथील श्री संत गोदड महाराज सप्ताह कार्यक्रमात मोठ्या भक्ती भावाने साजरी करण्यात आली. यावेळी सोनार समाजाबरोबरच इतर समाजातील लोक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी साजरी झाली.

कर्जत सराफ सुवर्णकार व सोनार समाजाच्या वतीने श्री संत गोदड महाराज यांच्या सप्ताह कार्यक्रम ठिकाणी श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे अभंग व भक्ती गीत गायन करून नरहरी महाराज यांची आरती करून पेढे वाटून पुण्यतिथी साजरी झाली. सुरवातीला श्री संत शिरोमणी नरहरी



महाराज यांच्या प्रतिमेची पुजा प्रसिद्ध सराफ अक्षय माळवे व त्यांची पत्नी सपना माळवे यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी सराफ सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष दीपक शहाणे, किशोर कुलथे,पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष माळवे, संतोष कुलथे, अतुल कुलथे, अक्षय माळवे, शुभम कुलथे, जयश्री कुलथे, माधवी कुलथे,निर्मला मैड, उषा कुलथे, पल्लवी कुलथे, भाग्यश्री कुलथे, सुजाता शहाणे, वर्षा कुलथे, सपना माळवे, छाया शेलार, शोभा धांडे, वैशाली पंडित, अनिता शेलार, सुशिला मिसाळ, शिवानी शहाणे, शारदा हवालदार, गिता गदादे, निलेश रत्नपारखी, दिनकर मिसाळ, अमोल कुलथे, मयूर शहाणे, ऋषीकेश टाक, अनिल कुलथे, कृष्णा कुलथे, योगेश पंडित, धनंजय महामुनी, सागर देवलालीकर, शरद शेलार सुरेश खिस्ती, दत्तात्रय शिंदे, संतोष देवकाते, हभप गोरखे महाराज, सागर सुर्वे, बप्पाजी धांडे यांच्या सह मोठ्या प्रमाणात लोक उपस्थित होते.

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त कर्जत येथील सराफ किशोर कुलथे यांनी त्यांच्या निवस्थानी रात्री ८ वा महाप्रसादाचे आयोजन केले होते.

# रस्त्याच्या कामाविरोधात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** कोपरगाव तालुका हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी कोपरगाव शहर ते सावळीविहीर फाटा हा राष्ट्रीय महामार्ग आहे पण तो केंद्र सरकारच्या अंतर्गत येत नाही या रस्त्याचे काम १३१ कोटी रुपयाला देण्यात आलेले आहे. कामाला देखील गती नाही व निक्रृष्ठ काम सुरू असल्याने सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी काळा झेंडा घेऊन कोपरगाव ते सावळीविहीर फाटा पायी जात नुकतेच आंदोलन केले.

संजय काळे यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाचे आदेश असून सावळीविहीर ते कोपरगाव हा रस्ता मजबूत होण्यासाठी खोदकाम करत मजबुती करून करून क्राकिटीकरण करावे भविष्यात हा रस्ता खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी असे म्हटले आहे संभाजीनगर किंवा मालेगाव कडून घेणारे जे साईभक्त



आहे ते ह्याच मार्गाने शिर्डीत साईंच्या दर्शनासाठी काही वाहनाने तर काही पायी चालत मोठ्या प्रमाणावर येत असतात पंचवीस वर्षापासून या रस्त्याची दुर्दशा झाली होती संबंधित ठेकेदार हा एका ठिकाणी खोदलेले मटेरियल दुसऱ्या ठिकाणी भर म्हणून टाकत आहे त्यामुळे हा निकृष्ट असलेला माल भर म्हणून टाकत आहे हा माल निकृष्ट असून निविदेत माती मुरूम गौन खनिज नवीन वापरावे असे म्हटलेले आहे तशी तरतूद देखील आहे जेव्हा गोदावरीला पूर येतो तेव्हा कोपरगावातील बेट भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचलेले असते त्यावेळी निकृष्ट टाकलेला हा भराव पाण्यात दम पकडणार नाही. अशावेळी हा रस्ता लवकरच खराब होणार आहे कोपरगाव ते सावळीविहीर या रस्त्याच्या ठिकाणी खोदकाम झाले आहे ते मटेरियल एका ठिकाणाहून उचलून नंतर दुसऱ्या ठिकाणी भर म्हणून टाकण्याचा जो प्रकार सुरू आहे त्या विरोधात लोकप्रतिनिधी व शासनाला जाग आणण्यासाठी आपण शांततेच्या मार्गाने कोपरगाव ते सावळीविहीर फाटा या रस्त्यावर काळे झेंडे घेऊन आपण शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असून हा रस्ता चांगला झाला पाहिजे ही आपली मागणी असून त्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी सांगितले.

# न्यू हायस्कुल वैजापूर येथे दहावीचा निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** न्यू हायस्कूलमधील दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना मंगळवारी निरोप समारंभ देण्यात आला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान नाना तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य एस एस डोंगरे, उल्हास साळुंखे, प्रकाश माळी , कांबळे सर, कॅप्टन जवाहर कोठारी, व्ही. डी. सोनवणे, मुख्याध्यापक संजय साळुंके, पर्यवेक्षक लहाने, भगतसिंग राजपूत, एस एल चव्हाण, ए ए शिंदे सी व्ही कीर्ते, एन आर कांडेलकर, एस. पी. जाधव, एस. डी. काळे, श्रीमती एस बी कोल्हे,एस व्ही वाणी, पी. बी. श्रीवास्तव, जी बी मरकड, आर. ए. निकम, आर. एस. काकडे, एस पी मुंडे, एस व्ही निकम, एस. एल. शेंगाळ, श्रीमती जोणवाल, श्री जी एस निकम यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी शाळेविषयी आपल्या भावना व्यक्त करताना, अश्रूंना वाट करून दिली. विद्यार्थी संकेत शिंदे, महेश खैरनार, रितेश शिंदे,रुपाली शिंदे, पूनम साबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या बॅचने शाळेला अहुजा कंपनीचा ब्लूटूथ स्पीकर भेट दिला. शिक्षकांपैकी एस. व्ही. वाणी, एस डी काळे, सी. व्ही. किर्ते यांनी मार्गदर्शन केले.






# उद्योजक बनताना कल्पकतेने व्यवसाय निवडा

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : बचत गट व सर्वसाधारण महिलांकरीता विविध शासकीय योजनांची कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्यास उद्योजक बनतांना व्यवसायाची कल्पकतेने निवड करणे आवश्यक आहे. जर सर्व बचतगटातील महिलांनी ठराविक प्रकारचेच व्यवसाय केले तर त्यात मागणी कमी व पुरवठा ज्यास्त होऊन तो उदयोगाला मारक ठरेल त्यामुळे व्यवसाय हा कल्पकतेने निवडण्याचे प्रतिपादन मा.पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

बचत गटातील व सर्वसाधारण महिलांकरीता विविध शासकीय योजनांची कार्यशाळा २४ फेब्रुवारी रोजी नियोजन भवन,जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडली. सदर कार्यशाळेचे उदघाटन मा.पालकमंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले त्याप्रसंगी ते बोलत होते. मा. पालकमंत्री यांनी सांगितले की, महिलांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी महीला बचतगटांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे,आज या कार्यशाळेतील मार्गदर्शिका सोनिया जाडा यांनी ज्याप्रमाणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे मार्गदर्शन सत्र सातत्याने आयोजीत करावे. त्यामाध्यमातुन महिलांना उद्योग,स्वयंरोजगारासंबंधी नवी दिशा कळेल. त्याचप्रमाणे महिलांसाठी शासनाच्या ज्या विविध योजना आहेत त्यांचा लाभ महिलांनी घेण्याचे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. कार्यशाळेत मनपा अंतर्गत महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना,राष्ट्रीय बँक अंतर्गत योजना,प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना,समाज कल्याण विभाग,महिला व बाल कल्याण विभाग,संजय गांधी निराधार योजना,महिला आर्थिक विकास महामंडळ,जिल्हा कौशल्य विकास केंद्र,नाबार्ड इत्यादी विभागातील शासनाच्या विविध योजनांचे प्रेझेंटेशन यावेळी उपस्थीत महिलांसाठी करण्यात आले. त्याचप्रमाणे बचत गटांना व वैयक्तिक लाभार्थ्यांना कर्ज मंजुरीचे पत्र व दोन दिव्यांग लाभार्थ्यांना ई-रिक्षा करीता कर्ज मंजुरी पत्र देण्यात आले. सानिया जाडाजी यांनी महिलांनी कुठला व्यवसाय योग्य राहील व व्यवसायात प्रगती कशी साधावी यासंबंधी प्रेरणादायी व्याख्यान दिले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन,मनपा आयुक्त विपीन पालीवाल,अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, अग्रणी जिल्हा प्रबंधक प्रशांत धोंगडे,जिल्हा कौशल्य विकास सहा. आयुक्त भैय्याजी येरमे,तृणाल फुलझेले,मधुकर भुरले,प्रदीप काथोडे,अजय साखरकर इत्यादी उपस्थीत होते.

कार्यक्रमासाठी दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान योजना प्रमुख रफिक शेख, रोशनी तपासे,चिंतेश्वर मेश्राम,शहर अभियान व्यवस्थापक तसेच समुदाय संघटक पांडुरंग खडसे,सुषमा करमनकर,रेखा लोणारे, रेखा पाटील, चिंगुताई मुन तसेच वॉर्ड सखी यांनी परीश्रम घेतले.

# मातृभाषा न्याय भाषा झाली पाहिजे : डॉ. नारायण टाक

आधुनिक केसरी न्यूज

**नसरापूर :** शंकरराव भेलके महाविद्यालय नसरापुर मराठी विभागाच्या वतीने वि वा शिरवाडकर कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिन आयोजित केला होता. यावेळी प्रमुख व्याख्याते डॉ नारायण टाक उपस्थित होते. मातृभाषेतून न्यायदानाचे काम झाले पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडली अजूनही अनेक फायदे इंग्रजी भाषेत असून सर्वसामान्य माणसाला कायद्याची भाषा इंग्रजी असल्यामुळे ते समजत नाहीत मातृभाषेतून न्याय मिळाल्यानंतर आपणास कशाप्रकारे न्याय मिळाला आहे हे जनसामान्याला अवगत होईल यासाठी न्यायालयीन भाषेला पारिभाषिक शब्द नेमकेपणाने योजनेचे काम भाषाभ्यासकांनी करावे कोणत्याही भाषेचा तिरस्कार न करता मातृभाषेचा अभिमान बाळगावा. जपान दक्षिण कोरिया चीन या देशात ज्ञानभाषा ही मातृभाषा आहे. तरी त्या देशांनी




प्रगतीची कास धरली आहे. भाषेचा वापर कमी झाला तर ती मृतप्राय होते. प्रमाण भाषेचे अवलंबन वाजवता बोलीभाषेतूनही व्यक्त होण्याचा आग्रह धरावा मातृभाषेचे संवर्धन केल्यामुळे आपोआपच संस्कृतचे देखील संवर्धन होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कुमारी अंकिता जैन ही सीए परीक्षेत उत्तीर्ण झाली त्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने तिचे स्वागत आणि सन्मान करण्यात आला. अंकिता जैन यांनी आपल्या मनोगतात कष्टाशिवाय यश नाही हे समजून सांगताना स्वतः घेतलेले कष्ट त्यासाठी सोळा तास केलेला अभ्यास आलेल्या अडचणी त्यावर केलेली मात यांचा ऊहापोह केला.

आपल्या अध्यक्ष मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांनी विद्यार्थ्यांनी मातृभाषेतून अधिकाधिक संवाद साधावा. तसेच सार्वजनिक ठिकाणी देखील मातृभाषेचाच वापर करावा. मातृभाषेवर आपले प्रभुत्व असेल तर कोणतीही भाषा आपल्याला आत्मसात करता येते असे त्यांनी सांगितले.

# ‘सेवा भारती’, ‘भारतीय विचार केंद्रम’ला जनकल्याण समितीचा ‘श्रीगुरुजी पुरस्कार’

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती’तर्फे ‘सेवा भारती दक्षिण तमिळनाडू’ आणि ‘भारतीय विचार केंद्रम, केरळ’ या दोन संस्थांची यंदाच्या ‘पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कारा’साठी निवड करण्यात आली आहे. पुण्यात ३ मार्च रोजी होणाऱ्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. या राष्ट्रीय पुरस्काराचे यंदा २९ वे वर्ष आहे. जनकल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. अजित मराठे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. संस्थेचे कार्यवाह राजन गोऱ्हे, संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सेवाकार्य प्रमुख शैलेंद्र बोरकर आणि 'सेवा भारती' पश्चिम महाराष्ट्र या संस्थेचे सचिव प्रदीप सबनीस यावेळी उपस्थित होते. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे आहे. पूर्व लोकसभाध्यक्ष सुमित्राताई महाजन पुरस्कार प्रदान कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत आणि संघाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आहेत. पुरस्कार प्रदान समारंभ रविवार, ३ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता कर्वे रस्त्यावरील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या मैदानावर होईल. ‘सेवा भारती’ ही संस्था दक्षिण तमिळनाडूतील ३१ जिल्ह्यांमध्ये सेवेच्या क्षेत्रात काम करत आहे. गेल्या चौतीस वर्षांपासून हे काम सुरू असून संस्थेतर्फे ३१ जिल्ह्यांमध्ये ५४१ ठिकाणी ८ हजारांहून अधिक सेवाकार्ये चालवली जात आहेत. शहरी, ग्रामीण तसेच वनवासी भागात ही सेवाकार्ये सुरू असून प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक क्षेत्रात संस्थेची सेवाकार्ये चालतात. रुग्णसेवा, संस्कारकेंद्र, दिव्यांग सेवा, अनाथालये, वृद्धाश्रम, परित्यक्तागृहे, गोसेवा, अन्नछत्र, महिला बचत गट, संगणक प्रशिक्षण, कुटुंब प्रबोधन, भजन मंडळी, दीपपूजा, मोबाईल ग्रंथालये, रस्ते स्वच्छता आदी अनेकविध प्रकारची सेवाकार्ये संस्थेतर्फे सुरू आहेत. ही सर्व सेवाकार्ये समाजाच्या दातृत्वशक्तीवर चालवली जातात. यंदा सेवा क्षेत्रासाठीचा पुरस्कार ‘सेवा भारती’ या संस्थेला प्रदान केला जाईल. केरळमधील तिरुवअनंतपूरम येथे १९८२ साली स्थापन झालेल्या ‘भारतीय विचार केंद्रम’ या संस्थेतर्फे प्रामुख्याने प्राचीन भारतीय सांस्कृतिक वारसा जतनाचे तसेच भारतीय जीवनमूल्ये आणि जीवनदर्शनाचा प्रचार-प्रसार हे कार्य चालते. भारतीय मूलभूत विषयांवर संशोधन करून त्याचा बुद्धिवंतांमध्ये आणि जनसामान्यांमध्ये प्रसार, विद्वानांच्या, अभ्यासकांच्या व्याख्यानांचे आयोजन, ग्रंथांचे प्रकाशन, संशोधनपत्रिकांचे प्रकाशन, परिषदा, परिसंवाद, चर्चासत्रांचे आयोजन आदी कामेही संस्थेतर्फे सुरू आहेत. ‘प्रगती’ या मल्याळम आणि इंग्रजीतील त्रैमासिकाचे प्रकाशनही भारतीय विचार केंद्रम या संस्थेतर्फे केले जाते. या संस्थेला यंदा वाड्मय क्षेत्रासाठीचा पुरस्कार प्रदान केला जाईल. या दोन्ही संस्थांचे त्यांच्या क्षेत्रातील कार्य लक्षणीय असून त्यांच्या या कार्याचा सन्मान ‘श्रीगुरुजी पुरस्कार’ प्रदान करून केला जाईल. पुणेकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून या संस्थांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन ‘जनकल्याण समिती’तर्फे करण्यात आले आहे.

जनकल्याण समितीची सेवाकार्ये

जनकल्याण समितीतर्फे महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, पूर्वांचल विकास, कृषी विकास आणि पर्यावरण या सात प्रमुख क्षेत्रात १८७० सेवाकार्ये सुरू आहेत. समितीचे पुरुष, महिला मिळून चार हजार कार्यकर्ते स्वयंसेवी वृत्तीने ही सेवाकार्ये चालवत आहेत.



# विज्ञानाने मानवी जीवनात विकासात्मक क्रांती झाली : अय्युब पठाण लोहगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** २८ फेब्रुवारीला नुकताच शाहू विद्यालय जायकवाडी (उत्तर) येथे " राष्ट्रीय विज्ञान दिन " अगदी उत्सावात साजरा करण्यात आला. यावेळी विद्याथ्र्यानी विज्ञानावर आधारीत भाषणे, डान्स, विविध ग्रह-तारे, वनस्पती जीवनसत्व या विषयावर साभिनय करून माहीती सांगितली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक शंकरराव वाघमोडे होते. जेष्ठ शिक्षक तथा प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, " विज्ञान हा मानवाचा तिसरा डोळा असून विज्ञानाने मानवी जीवनात विकासात्मक क्रांती घडविली आहे. फक्त मानवाने आपल्या हितासाठीच विज्ञानाचा उपयोग करावा. म्हणजे मानवाला सुख हे प्राप्त होऊन मानव समाधानी जीवन जगेल." यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक- शिक्षिका- शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# नागपूर शहरात पुन्हा वाढला पिस्तुलांचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गेल्या काही महिन्यांपासून शहरात गुन्हेगारांकडून पिस्तूलांचा वापर वाढला असून दर आठवड्यात आरोपींकडे पिस्तूल सापडल्याचे गुन्हे दाखल होत आहे. अशाच प्रकारे सोमवारीसुद्धा संशयावरून पकडलेल्या एका आरोपीच्या खिशातूनच चक्क पिस्तूल निघाल्याने पोलीस यंत्रणेत खळबळ उडाली आहे. तहसील पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला. सोमवारी मध्यरात्रीनंतर पोलिसांचे पथक गस्त घालत असताना मस्कासाथ मार्गावरील बंगालीपंजा येथील मेमन जमात हॉलच्या गल्लीत दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या बसलेले दिसले. पोलीस तेथे पोहोचले असता एक आरोपी पळून गेला तर दुसऱ्या आरोपीला सापळा रचून पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळून पिस्तूल, दोन जिवंत काडतूस आढळली. गणेश विश्वनाथ तलवारे (३०, चांद मोहल्ला, बंगालीपंजा) असे आरोपीचे नाव आहे.



# एमआयएम महिला कार्याध्यक्षपदी गजहास

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयएमच्या औरंगाबाद महिला कार्याध्यक्षपदी अंकिता गजहास यांची नियुक्ती करण्यात आली महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्या आदेशाने महिला प्रदेश अध्यक्ष कीर्ती डोंगरे, प्रदेश कार्याध्यक्ष रुहीनाज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष फिरदोस फातेमा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. रहेमानिया कॉलनी येथील महिला कार्यालयावर नियुक्तीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या ठिकाणी अंकिता गजहास यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. प्रदेश कार्याध्यक्ष डॉक्टर गफ्फार कादरी,औरंगाबाद जिल्हाध्यक्ष समीर साजिद बिल्डर, युवा जिल्हाध्यक्ष मुन्शी भैय्या पटेल, युवा जिल्हा कार्याध्यक्ष जावेद खान,शहराध्यक्ष शारेक नक्षबंदी, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अनिस पटेल,युवक जिल्हा महासचिव शेख कलीम,कामगार अध्यक्ष काकासाहेब काकडे,युवा नेते प्रांतोश वाघमारे आदि पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कुठल्याही कार्यक्रमाचे, ध्येयाचे सूक्ष्म नियोजन केल्याने जीवनात यश प्राप्त होते!

## समाज कल्याण उपायुक्त शिवानंद मिनीगिरे

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आपल्या पन्नास वर्षाच्या हयातीत छत्रपती शिवाजी महाराजांची एकही मोहीम ही अयशस्वी झाली नाही. त्यासाठी त्यांचे सूक्ष्म नियोजन महत्त्वाचे होते. त्याच धर्तीवर कुठल्याही कार्यक्रमाचे अथवा ध्येयाचे सूक्ष्म नियोजन करून त्या दिशेने वाटचाल केल्यावर त्याचे जीवनात नक्कीच यश प्राप्त होते असे प्रांजळ प्रतिपादन नांदेडचे समाज कल्याण उपाआयुक्त शिवानंद मिनीगिरे यांनी धर्माबाद मध्ये विश्वकर्मा जयंती मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

रेल्वे गेट नंबर दोन इंदिरानगर येथील वीर ब्रह्मगारूस्वामी व नवग्रह मंदिराच्या प्रांगणात विश्वकर्मा समाजातर्फे प्रभू विश्वकर्मा जयंती व श्री संत श्रेष्ठ नरहरी महाराज यांची ७३८वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजातील जेष्ठ असे सेवानिवृत्त मुख्याध्यापक गंगाधर पांचाळ हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विश्वकर्मा समाजाचे राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर, सरचिटणीस बालाजी खर्डे पाटील, दत्तात्रय टेंभुर्णीकर, चंद्रकांत लोखंडे श्री दादजवार, अँड.परमेश्वर पांचाळ, सौ श्रद्धा पांचाळ, गजानन पांचाळ यांच्यासह मराठवाडा व महाराष्ट्रातून अनेक मान्यवर उपस्थित होते.पहिल्या सत्रात विश्वकर्माच्या पालखीची मिरवणूक शहराच्या प्रमुख रस्त्यावरून निघाली त्यावेळी अनेक मान्यवरांनी विश्वकर्माची मनोभावे पूजा अर्चा केली. दुपारच्या सत्रात मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाल्यावर समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनीगिरे बोलत होते. नोकरीपेक्षा व्यवसाय कधीही चांगला नोकरी हा एक पर्याय असून व्यवसायात काम करणे हे कधीही श्रेष्ठ असते, आपण परिस्थितीला दोष देतो पण परिस्थिती आपण स्वतः निर्माण करतो आज घडीला शासन सर्वसामान्या सोबत आहे ते पूर्वी कधीही नव्हते, सर्वसामान्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्षित होते, आज घडीला विश्वकर्मा सन्मान योजनेद्वारे नांदेड जिल्ह्यातून संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक नाव नोंदणी झाली असून आजच्या विद्यार्थ्यांची दशा जर बघितली तर अंगात सर्व सुप्त गुण असतानाही आत्मविश्वासाची कमी पडत आहे त्यामुळे मोबाईलवर खेळ न खेळता मैदानी खेळ खेळा व विश्वकर्मा सन्मान योजनेचा लाभ घेत आपल्या व्यवसायाद्वारे यशस्वी उद्योजक बना असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्वजनिक बांधकाम विभाग भोकरची नगर अभियंता श्रद्धा पांचाळ यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते शंकर मामा दोरणाल यांच्या मार्गदर्शनात विश्वकर्मा जयंती मंडळाचे अध्यक्ष महेश पांचाळ, द्वारका पांचाळ, तुकाराम पांचाळ, ओमसाई पांचाळ, सत्यनारायण पांचाळ, मोहन पांचाळ यांच्यासह समस्त विश्वकर्मा समाजातील युवक व जयंती नियोजन समितीच्या सदस्यांनी कठोर परिश्रम घेतले.



यावेळी विश्वकर्मा समाजसेवक अँड .परमेश्वर पांचाळ यांनी विश्वकर्मा मंदिराच्या प्रांगणात आमदार राजेश पवार यांनी तब्बल 15 लक्ष रुपयाचा निधी विश्वकर्मा सभा मंडपासाठी मंजूर केला असला तरी आजतागायत ते काम का प्रलंबित आहेत असा प्रश्न विचारत आचारसंहितेपूर्वी सदरील कामास सुरुवात करावी अशी मागणी केली .

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा सन्मान योजना चालू करून विश्वकर्माच्या पाचही मुलांच्या वंशजाला रोजगार उपलब्ध करून मोठे व्यावसायिक होण्याची संधी उपलब्ध केली असली तरी सदरील योजनेचा लाभ आत्तापर्यंत का मिळाला नाही असा प्रश्न करीत ज्यांनी या योजनेअंतर्गत ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली त्यांना ताबडतोब या योजनेचा शासनाने लाभ द्यावा अशी मागणी केली .

